



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २८३ * नांदेड * शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेड जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी अंदाजे ५९.८१ टक्के मतदान

## ३६ हजार ६८७ मतदारांपैकी २१ हजार ९४२ मतदारांचा सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)–** ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नांदेड जिल्ह्यात शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सुरू झालेली मतदान प्रक्रिया सायंकाळी ४ वाजेपर्यंत शांततेत व सुरळीत पार पडली. जिल्ह्यातील सर्व १२० मतदान केंद्रांवर चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. सायंकाळी ४ वाजेपर्यंत जिल्ह्यात अंदाजे ५९.८१ टक्के मतदानाची नोंद झाली.

जिल्ह्यात सकाळी ८ ते १० या वेळेत ७.५४ टक्के, दुपारी १२ वाजेपर्यंत २१.२० टक्के, तर दुपारी २ वाजेपर्यंत ३७.४३ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर मतदानाचा टक्का वाढत सायंकाळी ४ वाजेपर्यंत ५९.८१ टक्क्यांवर पोहोचला. संपूर्ण मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततेत पार पडली.

जिल्ह्यातील मतदार यादीत एकूण ३६ हजार ६८७ मतदारांची नोंद होती. त्यापैकी २१ हजार ९४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये २८ हजार ६९४ पुरुष मतदारांपैकी १८ हजार १८० पुरुषांनी, तर ७ हजार ९९० महिला मतदारांपैकी ३ हजार ७६१ महिलांनी मतदान केले. तसेच तीन इतर मतदारांपैकी एका मतदाराने मतदान केले. महिला मतदारांच्या तुलनेत पुरुष मतदारांचा सहभाग अधिक राहिला.

**नांदेड जिल्ह्यात एकूण १२० मतदान केंद्रांवर मतदान**

| एकूण मतदार | पुरूष | महिला |
|---|---|---|
| ३६, ६८७ | २८, ६९४ | ७, ९९० |
| झालेले मतदान | २१, ९४२ | ३, ७६१ |
| मतदानाची टक्केवारी | ५९.८१% | |

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान केंद्रांवरील मतपेट्या आणि निवडणुकीचे साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सकाळी प्रतिभा निकेतन महाविद्यालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि यशवंत महाविद्यालय येथील मतदान केंद्रांना भेट देऊन पाहणी केली.**




**नांदेड जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघाच्या मतदानप्रसंगीच्या विविध छायाचित्रात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. अमरनाथ राजूरकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माधव पावडे, खा. प्रा. रवींद्र चव्हाण, मुखेडचे आ. डॉ. तुषार राठोड आदी दिसत आहेत.**

# विधान परिषदेच्या ५ जागांसाठी मतदान: उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील विधान परिषदेच्या बहुचर्चित शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडले. पुणे, नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा) या विभागांमधील एकूण ५ मतदारसंघांमध्ये ही निवडणूक होत असून, तब्बल १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे.

पुणे शिक्षक मतदार संघाच्या मतदानाच्या टक्केवारीच्या अहवालानुसार, एकूण ३२० मतदान केंद्रांवर ६१,९४० नोंदणीकृत मतदार आहेत, ज्यामध्ये ३७,७६८ पुरुष, २४,१६४ स्त्रिया आणि ८ तृतीयपंथीयांचा समावेश आहे. सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत एकूण ३५,७८० मतदान झालेज्यामध्ये २२,६१३ पुरुष, १३,१६६ स्त्रिया आणि १ तृतीयपंथी मतदाराने मतदान केले, ज्यामुळे या वेळेतील एकूण मतदानाची टक्केवारी ५७.८९ टक्के इतकी नोंदवली गेली आहे.

औरंगाबाद पदवीधर मतदारसंघासाठी धाराशिव जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रांवर शुक्रवारी सकाळी ८ वाजता मतदानाला शांततेत सुरुवात झाली. दुपारी २ वाजेपर्यंत जिल्ह्यातील ११ हजार ६३३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

चंद्रपूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ५८ मतदान केंद्रांवर मतदान झाले. दुपारी २ वाजेपर्यंत १३ हजार ७१८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यात आतापर्यंत ४२.५२ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

शुक्रवारी सकाळी ८ वाजेपासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली होती. सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदारांना आपला हक्क बजावला. मतपत्रिका अवैध ठरू नयेत, यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# धमक्यांच्या ई-मेलने मुंबईत खळबळ; सेलिब्रिटींची घरं, महापौरांचा बंगला आणि शाळांना धमकी, पोलिसांकडून तपास सुरू

**मुंबई (प्रतिनिधी)–** एकापाठोपाठ एक आलेल्या धमकीच्या मेलनं मुंबई हादरली आहे. सेलिब्रिटींची घरं, शाळा, महापौरांचा बंगला उडवून देण्याची धमकी ई-मेलमधून देण्यात आली आहे. त्यामुळे खळबळ माजली असून पोलिसांकडून वेगानं चक्र फिरवण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून धमकी देण्यात आलेल्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली असून पोलिसांकडून धमकी आलेल्या ई-मेल्सचा पाठपुरावा केला जात आहे.

मुंबईतील सेलिब्रिटींची घरं, महापौर कार्यालय, शाळा उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. बॉलिवूडचे बिग बी अमिताभ बच्चन यांचं घर ग्रेनाइडनं उडवून देण्याची धमकी दिली आहे. अमिताभ बच्चन यांचा बंगला जलसावर ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हल्ला करु अशी धमकी दिली आहे. त्यासोबतच प्रसिद्ध पंजाबी गायक दिलजीत दोसांझ यालाही धमकी मिळाली आहे. दिलजीत दोसांझ याची २७ नोव्हेंबरला कॉन्सर्ट होणार आहे, याच कॉन्सर्टमध्ये हल्ला करण्याची धमकी दिली गेली आहे.

दादरमधल्या ३ ते ४ शाळांनाही उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. त्यासोबतच, ऐरोलीतल्या विब्ग्योर शाळेला दुपारी १ वाजून ११ च्या सुमाराला उडवून देऊ अशी धमकी दिली गेलीय.

महापौर कार्यालयाला दुपारी ३.११ वाजता उडवू अशी धमकी धमकीचा ई-मेल आल्यानंतर दादरमधल्या शाळांना सुट्टी दिली गेली. विद्यार्थ्यांना घरी पाठवून पोलिसांकडून शाळेत तपास मोहीम राबवण्यात आली आहे.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांना पुन्हा एकदा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला आहे. महापौर कार्यालय बॉम्बनं उडवून देण्याची धमकी ई-मेलमधून देण्यात आली असून, त्यांना धमकी मिळण्याची ही तिसरी वेळ आहे. वारंवार धमकीचे ई-मेल येत असल्यानं या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

# दिल्ली पोलीस कॉकरोच पार्टीच्या नेत्यांना पुन्हा चौकशीसाठी बोलावणार, सौरव दास आणि आशुतोष रांका मागील नोटीसवर गैरहजर




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्ली पोलिसांची गुन्हे शाखा कॉकरोच पार्टीचे नेते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना चौकशीसाठी पुन्हा नोटीस बजावू शकते. पोलिसांनी यापूर्वी त्यांना चौकशीसाठी बोलावले होते, परंतु ते हजर झाले नाहीत. त्यांनी अधिक वेळ मागितला आहे. दिल्लीतील विशेष कार्यकारी दंडाधिकारी (एसईएम) न्यायालयाने बुधवारी दोन्ही नेत्यांना जामीन मंजूर केला. प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या जामीनपत्रावर त्यांची सुटका करण्यात आली. १३ ऑक्टोबर रोजी जंतर मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले होते. दिल्ली उच्च न्यायालय 'आयसा'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी दाखल केलेल्या याचिकेवरही आपला निकाल देणार आहे. बोरा यांनी दिल्ली पोलिसांच्या नोटीसला आव्हान दिले आहे, ज्यानुसार त्यांना १० हजार रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि तपासादरम्यान शांतता राखण्यासाठी एका हमीदाराची आवश्यकता होती.

१२ ऑक्टोबर रोजी सरकारने जंतर मंतरला आंदोलनाच्या ठिकाणांच्या यादीतून वगळले. असे असूनही, आशुतोष आणि सौरव १३ ऑक्टोबर रोजी तिरंगा घेऊन तिथे पोहोचले. शांतता नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली त्यांना पाच दिवसांसाठी तुरुंगात टाकण्यात आले. १९ ऑक्टोबर रोजी, त्यांच्या अटकेची मुदत आणखी दोन दिवसांनी वाढवण्यात आली. यापूर्वी बुधवारी, दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. न्यायालयाने म्हटले होते की, नेत्यांनी प्रथम दंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाची वाट पाहावी आणि गरज भासल्यास उच्च न्यायालयात जावे. बुधवारी, दिल्ली पोलिसांनी परवानगीशिवाय जंतर मंतरला गेल्याप्रकरणी आशुतोष रांका आणि सौरव दास यांच्याविरुद्धचा तपास गुन्हे शाखेकडे हस्तांतरित केला.

# ऑडियो क्लिपवरून भाजपाला घेरणाऱ्या रामदास कदम यांना दरेकरांचा थेट इशारा

### शिवसेना-भाजपात जुंपली

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दाखवलेली ऑडिओ क्लिप ही एआयची नसून ती भाजपाची क्लिप आहे, असे वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी केलं होतं. यावर भाजप नेते प्रविण दरेकरांनी प्रतिक्रिया दिली आहे. रामदास कदम यांच्यासारख्या जबाबदार नेत्यांनी बेजबाबदार वागणं चुकीचं असल्याचे मत भाजप नेते प्रविण दरेकर यांनी व्यक्त केले.

ते ज्येष्ठ नेते आहेत. एक मुलगा गृहराज्यमंत्री आहे दुसरा एमपीसीबीचा अध्यक्ष आहे. सत्तेत एकत्र असताना अशा प्रकारचे वक्तव्य करणं योग्य नाही. ऑडिओ क्लिपची एसआयटी लावा, मात्र भाजपला दोष देणं चुकीचं असल्याचे दरेकर म्हणाले. आम्हाला आमच्या नेत्यांचा देखील आदर आहे. जरांगेंना आमचं समर्थन होतं, मात्र व्यक्तिगत टीका जरांगे यांनी केली तेव्हा आम्ही टीका केली ती उघड केल्याचे दरेकर म्हणाले.

पडद्यामागे जरांगेला ताकद देणारे कोण होते? देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करायला आणि अंगावर सोडणारे कोण होते? असा सवाल देखील प्रविण दरेकरांनी केला. आम्ही बोलायचं का? फडणवीस यांना संपवण्यासाठी कोण ताकद देत होतं? असा सवाल देखील दरेकरांनी केला. देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप होत होते यांचे षडयंत्र होते का? मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केलं होतं असेही दरेकर म्हणाले.

**शिंदेंना संपवायचं असतं तर ऑडिओ क्लिपसमोर आणली असती का? –मनोज जरांगे**

शिंदेंना संपवायचं असतं तर ऑडिओ क्लिप समोर आणली असती का? माझे फोटो दाखवता, रामदास कदम तुम्ही फोटोग्राफर होता का? माझ्याविषयी बोलू नका, नाहीतर मी सुरु होईन. हे एकप्रकराच गौडबंगाल आहे. विनाकारण शिंदेंच्या मागे रामदास कदम यांनी साडेसाती लावलीय. माझ्याविषयी बोलू नका. नाहीतर मी ही सुरु होईन अशा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

ठाकरेंना मराठा आरक्षण टिकवता आलं नाही. फडणवीस सरकारनं अनेक योजना मराठा समाजाला दिल्याचे दरेकर म्हणाले.

मनोज जरांगे आत्तापर्यंत चांगले वाटत होते. आता जरांगे नाटक करत आहे असं बोलता. खोकल्याचे औषध तुम्ही सांगता. जरांगेंबाबत सुद्धा तुमची भूमिका बदलल्याचे दरेकर म्हणाले. प्रमाणिकपणे आंदोलन करत असेल तर आम्ही सोबत राहू. समाजासोबत आम्ही आहोत, लाखोंचे मोर्चे निघाले, मी तेव्हा घेतलेली भूमिका होती. मी पडद्यामागे कोणालाही भेटलो नाही असे दरेकर म्हणाले. जरांगेच्या आंदोलनाला कोणी खतपाणी घातलं हे समोर येईल असे दरेकर म्हणाले. रामदास कदम सत्तेत आहेत, महायुतीत आहेत असेही ते म्हणाले.

# नीट पेपरफुटी: मोटेगावकर यांच्या फोनमध्ये सापडलेले सर्व ४५ प्रश्न तंतोतंत जुळले!

**लातूर (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. लातूर येथील प्रसिद्ध 'आरसीसी क्लासेस'चे संस्थापक शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेच्या केमिस्ट्री विषयाचे सर्वच्या सर्व ४५ प्रश्न जसेच्या तसे आढळल्याची खळबळजनक माहिती केंद्रीय अन्वेषण विभागाच्या तपासातून उघड झाली आहे.

तपासादरम्यान स्पष्ट झाले आहे की, परीक्षेपूर्वीच व्हॉट्सअॅप, टेलिग्राम आणि एअरड्रॉपच्या माध्यमातून ही प्रश्नपत्रिका आणि त्याशी संबंधित साहित्य पसरवण्यात आले होते. सीबीआयने या प्रकरणी साक्षीदारांचे जबाब, हस्तलिखित नोट्स आणि पैशांच्या देवाणघेवाणीचे संदेश तपासून संपूर्ण साखळीचा पर्दाफाश केला आहे.




# नांदेड कचरा वाहतूक प्रकरण तापले; चोरीची कलमे वाढवा, कंत्राटदारासह दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करा –लोकन्याय आघाडीच्या १४ नगरसेवकांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत २१ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री २ वाजता कचरा वाहतूक करणारी दोन हायवा वाहने पकडण्यात आल्याच्या प्रकरणात गुन्हा क्रमांक १२०९/२०२६ नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा व्यापक व निष्पक्ष तपास करून चोरीसह इतर लागू कलमे वाढविण्यात यावीत, अशी मागणी नांदेड लोकन्याय विकास आघाडीच्या १४ नगरसेवकांनी केली आहे.

या प्रकरणात कंत्राटदार अशोक पालसह इतर जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका तपासून सहभाग आढळल्यास त्यांना सहआरोपी करावे, असे निवेदन पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहे.



महानगरपालिकेच्या मालकीच्या कचऱ्याची बेकायदेशीर वाहतूक झाली आहे का, याची सखोल चौकशी करावी. चोरी किंवा अन्य दंडनीय कृत्याचे पुरावे आढळल्यास भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील लागू कलमे वाढवावीत. कचरा कोणाच्या आदेशाने नेला, वाहनांना परवानगी व गेटपास कोणी दिला, यात कंत्राटदार व अधिकाऱ्यांची भूमिका काय होती, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**वजनकाटा, सीसीटीव्ही आणि देयकांची चौकशी**

एकाच कचऱ्याचे वारंवार वजन दाखवून, खोट्या नोंदी करून किंवा चुकीची देयके सादर करून महापालिकेची आर्थिक फसवणूक झाली आहे का, याची चौकशी करावी. त्यासाठी वजनकाट्याच्या मूळ नोंदी, सीसीटीव्ही फुटेज, वाहनांचे जीपीएस रेकॉर्ड, गेटपास, ट्रिप शीट, कंत्राटाची कागदपत्रे आणि कंत्राटदाराला अदा केलेल्या देयकांची तपासणी करावी व अनियमितता आढळल्यास जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी आहे.

या निवेदनावर राहुल सोनसले, ॲड. शेख बिलाल, शेख उम्मे आयमन सय्यद रिजवान, सय्यद शोएब, मोहसिन खान, सुनिता रूपक जोंधळे, सत्यपाल सावंत, महजाबिन बेगम अब्दुल फहीम, परवीन बेगम शेख पाशा, शेख बाबू भाऊ खोकेवाले, आफिया नाज नाफे काझी, मुन्ना अब्बास हुसेन, ज्योती रमेश गोडबोले, हलिमा बी शेख बाबू या नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दारू पिण्यास नकार दिल्याने मित्रावर खंजरने हल्ला; पावडेवाडी नाक्यावर थरार, आरोपीला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** दारू पिण्यासाठी सोबत येण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका तरुणावर खंजरने हल्ला करून जखमी केल्याची घटना पावडेवाडी नाका, विजयनगर येथे घडली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पावडेवाडी नाका, विजयनगर येथे फिर्यादी आणि साक्षीदार कृष्णकांत बोकारे यांच्या घरासमोर उभे असताना आरोपी रोहित यलप्पा जागणे (रा. विजयनगर, नांदेड) हा तेथे आला. त्याने गाडी काढ, दारू पिण्यासाठी जाऊन येऊ असे फिर्यादीस सांगितले. फिर्यादीने सोबत येण्यास नकार दिल्याने आरोपीने शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या उद्देशाने खंजरने फिर्यादीच्या दंडावर वार करून गंभीर जखमी केले.

भांडण सोडविण्यासाठी आलेले फिर्यादीचे मित्र कृष्णकांत बोकारे व सुनील पुटवाड यांच्यावरही आरोपीने खंजरने पायावर वार करून जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी फिर्यादी आशिष संभाजी फुलारी (वय २५, रा. गणेशनगर, नांदेड) यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी थडवे करत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# पाणीटंचाईची होणारच, पण नियोजनाचे काय ?

मराठवाड्यावर सातत्याने अत्याचार झाले आहेत. आता निसर्ग देखील तेच करतो आहे. इथे शेतकऱ्यांना आसमानी आणि सुलतानी संकट कधीच कमी पडले नाही. सध्याची परिस्थिती पाहता मराठवाड्यात पावसाने तब्बल दीर्घकालीन ओढ दिल्याने दुष्काळाचे संकट पुन्हा गडद झाले आहे. विभागात आतापर्यंत सरासरी-पेक्षा १९९ मिलिमीटर पावसाची तूट असून, ४९६ पैकी २७५ महसूल मंडळांत अत्यल्प पाऊस झाला आहे. ही केवळ आकडेवारी नाही, तर आगामी महिन्यांतील पाणीटंचाईची स्पष्ट पूर्वसूचना आहे. त्यामुळेच पुढील पावसाळ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची वेळ आता आली आहे. मराठवाड्यातील परिस्थितीचे गांभीर्य शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीतूनही स्पष्ट होते. शेतीवरील संकट, पावसाची अनिश्चितता आणि वाढता उत्पादन खर्च यांचा हा वेदनादायी परिणाम आहे. अशा परिस्थितीत पाणी हा केवळ शेतीचा विषय न राहता मानवी जीवनाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न बनतो. मराठवाड्यातील मोठ्या धरणांपैकी जायकवाडी आणि विष्णुपुरी वगळता अनेक ठिकाणी समाधानकारक पाणीसाठा नाही. त्यामुळे उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय झाला आहे. मात्र निर्णय घेणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यात मोठा फरक आहे. पिण्याच्या पाण्याची गरज मार्च-एप्रिलपासून तीव्र होते. त्यामुळे त्या वेळी विहिरी आटल्या, बोअरवेल निकामी झाल्या आणि टँकरची मागणी वाढली की घाईघाईने उपाययोजना करण्यापेक्षा आत्ताच गावनिहाय पाणीबजेट तयार झाले पाहिजे. कोणत्या गावात किती लोकसंख्या आहे, उपलब्ध जलस्रोत किती आहेत, त्यांची सद्यस्थिती काय आहे, कोणत्या विहिरींचे अधिग्रहण करता येईल, कोणत्या गावांना टँकरची गरज भासू शकते, कोणत्या पाणीपुरवठा योजना अपूर्ण आहेत, याचा सविस्तर आराखडा प्रत्येक गावासाठी तयार करण्याची गरज आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे गावनिहाय सूक्ष्म नियोजन ही केवळ प्रशासकीय सूचना न राहता त्याची नियमित अंमलबजावणी आणि देखरेख झाली पाहिजे. यंदाचा सर्वाधिक पाणी टंचाईचा अनुभव लक्षात घेता केवळ धरणांवर अवलंबून राहणेही धोकादायक आहे. स्थानिक जलस्रोतांचे पुनर्भरण, विहिरींची दुरुस्ती, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांची पूर्तता, गळती रोखणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर यांना प्राधान्य द्यावे लागेल. प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना तातडीने गती देणे ही सरकारची जबाबदारी आहे. चाऱ्याबाबतही प्रशासनाने डिसेंबर २०२६ पासून संभाव्य टंचाईचा अंदाज व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील पशुधनाची दररोज सुमारे २०,१२५ मेट्रिक टन चाऱ्याची गरज आहे. त्यामुळे पाणी आणि चारा या दोन्ही संकटांकडे स्वतंत्रपणे नव्हे, तर परस्परांशी जोडलेल्या ग्रामीण संकटाच्या रूपात पाहावे लागेल. दुष्काळ जाहीर करण्यासाठी केवळ पावसाची आकडेवारी पुरेशी नाही; दुष्काळाचे परिणाम कमी करण्यासाठी वेळेवर कृती महत्त्वाची आहे. पावसाने दगा दिल्यानंतर टँकर सुरू करणे, चारा छावण्या उभारणे आणि मदत जाहीर करणे हा नेहमीचा उपचार झाला आहे. यावेळी मात्र पुढील पावसाळ्यापर्यंत प्रत्येक नागरिकाला पुरेसे पिण्याचे पाणी मिळेल, याची हमी देणारे नियोजन आतापासूनच झाले पाहिजे. नांदेड शहरात तर विष्णुपुरी धरण भरलेले असो अथवा नसो नागरिकांना आठवड्यातून दोन वेळाच पाणी पुरवठा केला जातो. याच्या नियोजनाकडेही महापालिकेने लक्ष द्यायला हवे. पण संपूर्ण मराठवाड्याला आगामी आठ-दहा महिन्यांसाठी पाणी आराखडा, गावनिहाय जलहिशेब आणि कठोर अंमलबजावणी हाच सध्याच्या संकटातून मार्ग आहे. पाऊस कधी पडेल हे सरकारच्या हातात नाही; मात्र उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे निश्चितच सरकारच्या हातात आहे. आता विलंब नको. पुढील पावसाळ्यापर्यंतच्या प्रत्येक दिवसासाठी पाण्याचे नियोजन आजच झाले पाहिजे.

# संयुक्त राष्ट्र दिन : शांततामय आणि समताधिष्ठित विश्वनिर्मितीचा संकल्प



दरवर्षी २४ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'संयुक्त राष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचे स्मरण करून देणारा नसून, संपूर्ण मानवजा-तीने शांतता, सहकार्य, समानता, न्याय आणि मानवी प्रतिष्ठा यांसाठी स्वीकारलेल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. जगातील विविध राष्ट्रांच्या भाषा, संस्कृती, धर्म, राजकीय व्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती वेगवेगळी असली, तरी युद्ध, दारिद्र्य, भूक, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि सामाजिक विषमता यांसारखे प्रश्न संपूर्ण मानवजातीसमोर आव्हान निर्माण करतात. या समस्यांचे परिणाम कोणत्याही एका देशापुरते मर्यादित राहत नाहीत. त्यामुळे जागतिक प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रांमध्ये संवाद, परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना असणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि भयमुक्त जीवन जगता यावे, तसेच राष्ट्रांमधील संघर्षांचे निराकरण शांततापूर्ण मार्गाने व्हावे, या व्यापक उद्देशातून संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती झाली. म्हणूनच संयुक्त राष्ट्र दिन हा जागतिक ऐक्याचा संकल्प दृढ करण्याचा आणि मानवतेसमोरील प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे.

विसाव्या शतकातील दोन महायुद्धांनी जगाला मानवी विनाशाची भीषण अनुभूती दिली. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय शांतता टिकविण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली; मात्र दुसऱ्या महायुद्धाला रोखण्यात त्याला यश आले नाही. १९३९ ते १९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धात कोट्यवधी लोकांना प्राण गमवावे लागले. अनेक शहरे उद्ध्वस्त झाली, अर्थव्यवस्था कोलमडल्या आणि असंख्य कुटुंबे विस्थापित झाली. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्यांनी विज्ञानाच्या प्रगतीचा विनाशकारी वापर किती भयानक ठरू शकतो, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. युद्धामुळे निर्माण होणारा द्वेष, असुरक्षितता आणि मानवी हक्कांचा ऱ्हास यांचा परिणाम अनेक पिढ्यांवर होतो, याची जाणीव जगाला झाली. राष्ट्रांमधील मतभेद केवळ शस्त्रांच्या बळावर सोडविण्याचा प्रयत्न केल्यास विनाश वाढतो; त्याऐवजी संवाद, मध्यस्थी, आंतरराष्ट्रीय कायदा आणि परस्पर सहकार्य यांना प्राधान्य दिले पाहिजे, हा विचार अधिक दृढ झाला. याच ऐतिहासिक पार्श्वभूमीवर जागतिक शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी अधिक व्यापक व प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना ही या प्रयत्नांचा ऐतिहासिक परिणाम होता. १९४५ मध्ये सॅन फ्रान्सिस्को येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत संयुक्त राष्ट्रांची सनद तयार करण्यात आली. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी आवश्यक अटी पूर्ण झाल्यानंतर ही सनद अंमलात आली आणि संयुक्त राष्ट्र संघटना अधिकृतपणे अस्तित्वात आली. त्यामुळे दरवर्षी २४ ऑक्टोबर हा संयुक्त राष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. या संघटनेच्या सनदेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे, राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे, आर्थिक व सामाजिक समस्यांवर सहकार्य वाढविणे आणि मानवी हक्कांविषयी आदर प्रस्थापित करणे ही प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांची स्थापना म्हणजे युद्धाने उद्ध्वस्त झालेल्या जगाने शांततापूर्ण भविष्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. राष्ट्रांनी आपापले मतभेद बाजूला ठेवून जागतिक कल्याणासाठी एकत्र येण्याची आवश्यकता या संघटनेने अधोरेखित केली. तथापि, संघटनेच्या स्थापनेनंतरही जगात अनेक युद्धे आणि संघर्ष झाले. यावरून शांततेसाठी केवळ संघटना स्थापन करणे पुरेसे नसून तिच्या उद्दिष्टांप्रती राष्ट्रांची प्रामाणिक बांधिलकीही आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.

आज संयुक्त राष्ट्र संघटना ही जगातील जवळजवळ सर्व स्वतंत्र राष्ट्रांना एकत्र आणणारी व्यापक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. तिच्या महासभेत प्रत्येक सदस्य राष्ट्राला प्रतिनिधित्व मिळते आणि जागतिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध होते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याची विशेष जबाबदारी सुरक्षा परिषदेवर आहे. मात्र, सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्यांना असलेल्या नकाराधिकारामुळे अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर मोठ्या राष्ट्रांच्या राजकीय हितसंबंधांचा प्रभाव पडतो. त्यामुळे या व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी सातत्याने केली जाते. विकसनशील राष्ट्रांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे, निर्णयप्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर अधिक न्याय्य पद्धतीने निर्णय घेतले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. या मर्यादा असूनही संयुक्त राष्ट्र संघटना विविध देशांना संवादासाठी एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देते. राष्ट्रांमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मतभेदांचे रूपांतर हिंसाचारात होऊ न देता त्यावर शांततापूर्ण मार्ग शोधणे, हे आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

जागतिक शांतता हा संयुक्त राष्ट्रांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. आजही जगातील अनेक भागांत युद्धे, सीमावाद, गृहसंघर्ष, दहशतवाद आणि राजकीय अस्थिरता यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन संकटात सापडले आहे. युद्धाचा परिणाम केवळ रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांपुरता मर्यादित राहत नाही. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि सामान्य नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागते. घरे, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था आणि रोजगाराची साधने उद्ध्वस्त झाल्यामुळे समाजाची विकासप्रक्रिया खंडित होते. लाखो लोकांना आपली जन्मभूमी सोडून विस्थापित किंवा निर्वासित म्हणून जगावे लागते. अशा परिस्थितीत युद्धविरामासाठी प्रयत्न करणे, वाटाघाटींना प्रोत्साहन देणे, संघर्षग्रस्त भागांत मानवतावादी मदत पोहोचविणे आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य घडवून आणणे, ही संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची कार्ये आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये विविध देशांचे सैनिक, पोलीस आणि नागरी तज्ज्ञ सहभागी होतात. या मोहिमांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असला, तरी संघर्षग्रस्त प्रदेशांत स्थैर्य निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. खरी शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला भयमुक्त आणि सन्मानपूर्ण जीवन जगता येणे होय.

पर्यावरण संरक्षण आणि हवामानबदल हे आजचे जागतिक प्रश्न आहेत. वाढते तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांचा परिणाम जगातील विविध देशांवर होत आहे. या संकटांचा सर्वाधिक परिणाम अनेकदा गरीब आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असलेल्या समुदायांवर होतो. भारतासारख्या कृषिप्रधान देशात हवामानातील बदलांचा परिणाम शेती, पशुपालन, पाणीपुरवठा आणि ग्रामीण रोजगारावर होतो. महाराष्ट्रातील दुष्काळी भागांत पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि रोजगाराच्या अभावामुळे ग्रामीण कुटुंबांचे जीवन अस्थिर होते. त्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न केवळ निसर्गाच्या संरक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक न्याय आणि आर्थिक सुरक्षिततेशीही संबंधित आहे. जलसंधारण, जंगलांचे संरक्षण, स्वच्छ ऊर्जेचा वापर, शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी हवामानबदलाच्या प्रश्नावर परस्पर सहकार्य करून आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी जतन करणे ही आजच्या पिढीची सामूहिक जबाबदारी आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात भारताचे योगदानही महत्त्वाचे आहे. भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य असून आंतरराष्ट्रीय शांतता, वसाहतवादविरोध, वर्णद्वेषाविरुद्धचा संघर्ष आणि विकसनशील देशांच्या प्रश्नांना जागतिक व्यासपीठावर स्थान मिळवून देण्यासाठी भारताने भूमिका बजावली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भारताने सैनिक आणि इतर कर्मचारी सहभागी केले आहेत. शांततापूर्ण सहअस्तित्व, संवाद आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या तत्त्वांना भारताच्या परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय राज्यघटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषयक विचारांशी सुसंगत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक लोकशाहीच्या विचारात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या परस्परसंबंधावर भर दिला आहे. समाजातील विषमता दूर करून प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेने जगण्याची संधी देणे, हे लोकशाहीचे खरे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि देशांतर्गत सामाजिक न्याय यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे. समाजात अन्याय, भेदभाव आणि शोषण कायम असेल, तर शांतता केवळ वरवरची ठरू शकते. न्याय्य आणि समताधिष्ठित समाजरचना ही दीर्घकालीन शांततेची महत्त्वाची पूर्वअट आहे.

२४ ऑक्टोबरचा संयुक्त राष्ट्र दिन आपल्याला भावी पिढ्यांसाठी कोणते जग निर्माण करायचे आहे, याचा विचार करण्याची संधी देतो. युद्ध, द्वेष, विषमता आणि पर्यावरणीय संकटांनी ग्रस्त जग भावी पिढ्यांच्या हाती सोपविण्याऐवजी शांतता, न्याय, समान संधी आणि सहकार्यावर आधारित समाज निर्माण करण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे यश केवळ ठरावांच्या संख्येवर किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांवर मोजता येणार नाही; तर सामान्य माणसाचे जीवन किती सुरक्षित झाले, किती लोकांना शिक्षण आणि आरोग्यसेवा मिळाली आणि किती समाजांमध्ये न्याय व शांततेची शक्यता निर्माण झाली, यावर ते ठरेल. प्रत्येक राष्ट्राने आपली जबाबदारी ओळखून जागतिक समस्यांच्या निराकरणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवजातीचे भविष्य परस्पर द्वेषात नसून सहकार्यामध्ये, युद्धात नसून शांततेमध्ये आणि विषमतेत नसून न्याय्य संधींमध्ये आहे. 'एक पृथ्वी, एक मानवजात आणि सामायिक भविष्य' ही भावना केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली, तरच संयुक्त राष्ट्र दिनाचा खरा उद्देश साध्य होईल. जागतिक शांतता, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांसाठीचा सामूहिक संकल्प दृढ करणे, हाच या दिवसाचा सर्वांत महत्त्वाचा संदेश आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# दिवाळी असावी फटाकेमुक्त!

हिंदू धर्मातील सण, उत्सव केवळ मौज मजेसाठी असतात असे नव्हे, तर प्रत्येक सणामागील शास्त्र आणि ते कसे साजरे करावेत याबाबतचे सविस्तर ज्ञान आपल्या ऋषी मुनींनी हजारो वर्षांपूर्वी मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्यास मिळणारा लाभ अधिक असतो. गेल्या काही वर्षांत आपल्या सण उत्सवांत अनेक अपप्रवृत्तींचा शिरकाव झाला आहे. या अपप्रवृत्ती एवढ्या हामी झालेल्या आहेत की सण उत्सवांच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाऊ लागला आहे. वर्णभेद विसरून एकत्र येण्याची शिकवण देणाऱ्या गोपाळकाला सणामध्ये आता दहीहंडीच्या मनोऱ्यांचीच स्पर्धा रंगू लागली आहे. त्यावर लाखो रुपयांची बक्षिसे लावली जाऊ लागली आहेत. उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येऊन राष्ट्र आणि धर्म याबाबत संघटितपणे कार्य करण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या गणेशोत्सवामागील मूळ उद्देश बाजूला सरून प्रतिवर्षी गल्लीबोळांत नवनवीन मंडळे स्थापन होऊ लागली आहेत. गणेश मूर्ती, सजावट, मिरवणूक यांसारख्या कारणांनी मंडळांमध्ये तंटे होऊ लागले आहेत. नुकत्याच सरलेल्या नवरात्री उत्सवाचेही पुरते बाजारीकरण झाले आहे. येऊ घातलेला दिपावली सणही यातून सुटलेला नाही. दीपावली म्हटले की दिव्यांची रोषणाई, कंदिलांची सजावट, फराळाचा सुगंध यासारख्या बाबी डोळ्यासमोर यायला हव्यात; मात्र सध्या दिवाळी म्हटले तर सर्वात आधी आठवते ती सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी, त्यामुळे होणारा धुरच धूर, वाढणारे वायू प्रदूषण आणि कानठळ्या बसवणारे आवाज.

मुलांना कोणी सांगितले कि 'यंदा दिवाळीला कोणीही फटाके नाही फोडायचे' तर मुले त्याचे ऐकतील का ? अजिबात नाही. 'फटाके दिवाळीला नाही फोडायचे तर केव्हा फोडायचे ?' असा लागलीच त्यांचा प्रतिप्रश्नही



असेल. अर्थात ही चूक लहानग्यांची अजिबात नाही. गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त एवढ्या प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात कि फटाके हीच दिवाळीची खरी ओळख आहे की काय असा प्रश्न पडतो. दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच. दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून ? एरव्ही लग्न समारंभ, उदघाटनाच्या कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये आणि राजकीय सभांच्या वेळी आतषबाजी म्हणून फटाके फोडणे एकवेळ मान्य; मात्र दिवाळीसारख्या धार्मिक सणाचा आणि फटाके फोडण्याचा काय संबंध ?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे. आजमितीला शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठमोठे कारखाने तयार झाले आहेत. येथून संपूर्ण भारतात फटाके पुरवले जातात. शिवकाशी येथे तयार केल्या जाणाऱ्या फटाक्यांना भारतभरातून विशेष मागणी आहे. दिवाळी सणाला सहस्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८४ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते.

दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादेपासून फटाके फोडण्यासाठीची निषध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र शहरासारख्या ठिकाणी या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा यक्ष प्रश्न प्रशासनासमोर असतो. यंदा उच्च न्यायालयाने रस्त्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यावर बंदी घातली आहे; मात्र त्याची अंमलबजावणी कितपत होईल हे दिवाळी सुरु झाल्यावरच कळेल. २०२१ साली दिवाळीच्या दिवसांत भारतभरात सुमारे ४२०० कोटी रुपयांचे फटाके फोडले गेले. २०२२ मध्ये हाच आकडा ६००० कोटींपर्यंत पोहोचला. २०२३ साली दिवाळी दरम्यान अनुमाने ६६०० कोटी रुपयांचे फटाके फोडले गेले तर २०२४ आणि २०२५ मध्ये फटाके खरेदीचा आकडा ७००० कोटींपर्यंत पोहोचला. यंदा हा आकडा याहून अधिक भयावह असेल. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणेही दुरापास्त आहे. देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. यंदा उभा महाराष्ट्र दुष्काळाचा सामना करत आहे अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे ?

प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्तेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

**-जगन घाणेकर**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# मुलांच्या हातात मोबाईल; पण विचारशक्तीचे काय ?

तंत्रज्ञानाच्या वेगात बालपण हरवू नये, ज्ञानाच्या गर्दीत स्वतंत्र विचार हरवू नये!असे मला राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक म्हणून वाटते. आजच्या मुलांच्या हातात मोबाईल आहे, डोळ्यांसमोर डिजिटल जग आहे आणि एका स्पर्शात माहितीचा अफाट खजिना उपलब्ध आहे. पूर्वी एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ग्रंथालयाची वाट धरावी लागायची; आज तेच उत्तर काही सेकंदांत मिळते.तंत्रज्ञानाने ज्ञानाचे दरवाजे खुले केले, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.मात्र, या सुविधांच्या गर्दीत एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहेमुलांना माहिती मिळत आहे; पण त्या माहितीचा विचारपूर्वक अर्थ लावण्याची क्षमता विकसित होत आहे का?

हा प्रश्न केवळ मोबाईलच्या वापरापुरता मर्यादित नाही. तो मुलांच्या एकाग्रतेचा, कल्पनाशक्तीचा, वाचनसंस्कृतीचा, भावविश्वाचा आणि भविष्यातील बौद्धिक विकासाचा आहे.

आजचे बालपण पूर्वीपेक्षा वेगळे झाले आहे. खेळाचे मैदान, मित्रांसोबतचा प्रत्यक्ष संवाद, गोष्टींचे पुस्तक, निसर्गाचे निरीक्षण आणि प्रश्न विचारत शिकण्याची प्रक्रिया यांची जागा अनेकदा मोबाईलवरील व्हिडिओ, खेळ आणि सतत बदलणाऱ्या दृश्यांनी घेतली आहे. अर्थात, प्रत्येक मुलाचा अनुभव सारखा नसतो आणि मोबाईलचा वापर नेहमीच हानिकारक असतो, असेही नाही. शैक्षणिक व्हिडिओ, भाषाशिक्षण, विज्ञानविषयक माहिती आणि सर्जनशील उपक्रमांसाठी डिजिटल साधने उपयुक्त ठरू शकतात.मात्र, जेव्हा मोबाईल हा करमणुकीचा एकमेव आधार बनतो, तेव्हा मुलांना शांतपणे बसून वाचणे, एखाद्या प्रश्नावर विचार करणे, अडचणीवर स्वतः उपाय शोधणे आणि एखादे काम पूर्ण होईपर्यंत प्रयत्न करणे कठीण जाऊ शकते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तत्काळ मिळण्याची सवय लागली, तर उत्तर शोधण्याच्या प्रक्रियेतील जिज्ञासा आणि चिकाटी कमी होण्याची शक्यता असते.माहिती मिळविणे म्हणजे ज्ञान संपादन करणे नव्हे; त्या माहितीचे आकलन, विश्लेषण आणि योग्य उपयोग करणे म्हणजे खरे शिक्षण.

मुलांनी मोबाईल वापरू नये, असे सांगणे सोपे आहे; पण त्यांना त्याऐवजी काय द्यायचे, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. पालक स्वतः सतत मोबाईलमध्ये गुंतलेले असतील, तर मुलांकडून वेगळी अपेक्षा करणे कितपत योग्य ठरेल?मुलांशी मनमोकळा संवाद साधणे, त्यांच्यासोबत पुस्तक वाचणे, गोष्टी सांगणे, मैदानी खेळ खेळणे आणि त्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तरे देणे या साध्या वाटणाऱ्या कृतींचा बालविकासात मोठा वाटा असतो. घरात काही वेळ मोबाईलमुक्त ठेवणे, जेवताना फोन बाजूला ठेवणे आणि वयानुसार योग्य डिजिटल मर्यादा निश्चित करणे यामुळे मुलांना संतुलित सवयी लावता येतात.

वर्गात चर्चासत्रे, प्रयोग, प्रकल्प, वाचन, निरीक्षण, गटकार्य आणि समस्यांवर उपाय शोधण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना प्रत्येक वेळी तयार उत्तर देण्याऐवजी स्वतः उत्तर शोधण्यास प्रवृत्त केले पाहिजे. इंटरनेटवर मिळालेली माहिती खरी आहे की दिशाभूल करणारी, हे तपासण्याची सवयही लावली पाहिजे.

मोबाईल, इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांना सरसकट दोष देणे योग्य ठरणार नाही. काळानुसार शिक्षणाची साधने बदलणारच आहेत. प्रश्न तंत्रज्ञान वापरायचे की नाही, हा नसून ते कसे, किती आणि कोणत्या उद्देशाने वापरायचे, हा आहे.मुलांचे वय, गरज, अभ्यास, झोप, शारीरिक हालचाल आणि सामाजिक संवाद लक्षात घेऊन डिजिटल वापराचे नियोजन केले पाहिजे. पालकांनी वयाला अनुरूप सामग्री निवडावी, मुलांसोबत ऑनलाइन अनुभवांवर चर्चा करावी



आणि इंटरनेटवरील गोपनीयता व सुरक्षिततेचे भान द्यावे.तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांना अधिक चांगले शिकता येत असेल, तर त्याचे स्वागत करावे; पण त्याच तंत्रज्ञानामुळे मुलांची जिज्ञासा, स्वावलंबन किंवा प्रत्यक्ष जगाशी असलेले नाते बाधित होत असेल, तर त्याचा पुनर्विचार करावा. तंत्रज्ञानाने मुलांच्या क्षमतांना पंख द्यावेत; त्यांच्या विचारांना मर्यादा घालू नयेत.

आजची पिढी डिजिटल जगात वाढत आहे. तिला तंत्रज्ञानापासून दूर ठेवणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. मात्र, त्या तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करण्याची क्षमता विकसित करणे ही पालक, शिक्षक आणि शिक्षणव्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे.मुलांच्या हातातील मोबाईल किती आधुनिक आहे, यापेक्षा त्यांच्या मनातील प्रश्न किती जिवंत आहेत, हे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांना किती माहिती मिळते, यापेक्षा त्या माहितीमधून स्वतःचा विचार घडविण्याची क्षमता किती विकसित होते, हे शिक्षणाचे खरे मोजमाप ठरले पाहिजे.मोबाईल मुलांना उत्तरे देऊ शकतो; पण प्रश्न विचारण्याची जिज्ञासा, सत्य शोधण्याची वृत्ती आणि योग्य-अयोग्य ठरविणारा विवेक आपणच घडवला पाहिजे. कारण उद्याचे भविष्य केवळ तंत्रज्ञान वापरणाऱ्या मुलांच्या हातात नाही, तर तंत्रज्ञानाचा वापर विवेकाने करणाऱ्या, स्वतंत्र विचार करणाऱ्या आणि माणुसकी जपणाऱ्या पिढीच्या हातात सुरक्षित असेल.

**-पंडित पवळे**
शिक्षणयोगी,नांदेड
ाळश्र: रिपवळींरुरिश्रशसाळश्र.लो

# शैक्षणिक संस्था मोठी करण्यात माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा -संचालक डॉ. बी. एस. सुरवसे

## जैविकशास्त्र संकुलात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जैविकशास्त्र संकुलात दि. २२ ऑक्टोबर रोजी माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला. माजी विद्यार्थ्यांचे संकुलाशी असलेले ऋणानुबंध दृढ करणे, त्यांच्या अनुभवांचा सध्याच्या विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देणे आणि संकुलाच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे, हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैविकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे होते.



यानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हरित विद्यापीठाच्या संकल्पनेला हातभार लावण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरवसे म्हणाले, शैक्षणिक संस्था मोठी करण्यात माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा असतो. विविध क्षेत्रांत आपल्या बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे माजी विद्यार्थी ही संस्थेची खरी संपत्ती आहे. शैक्षणिक, संशोधन, सामाजिक तसेच प्रशासकीय क्षेत्रांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांच्या अनुभवांतून सध्याच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी दिशा मिळते आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीस मदत होते. माजी विद्यार्थी म्हणजे भूतकाळातील अभिमान, वर्तमानकाळातील प्रेरणा आणि भविष्यकाळातील आशा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या मेळाव्यास डॉ. दीपक पुरी, डॉ. व्यंकटेश जाधव, दर्शन पाटील, डॉ. नागेश ढोले, डॉ. गंगाधर भोसले, शेख नबीला, संतोष राऊत, स्वाती साळवे, डॉ. रोहिणी चव्हाण, अमृता साडेगावकर, वैभवी बुरांडे, संतोष भवर, संकेत कदम, पूजा पतंगे, मोहिनी सालमोटे, अतुल बेळीकर, महेश खंदारे, शुभम गुडडेटवार यांच्यासह विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी उपस्थित होते.

व्यासपीठावर प्रा. डॉ. टी. ए. कदम, प्रा. डॉ. ए. पी. पाठक आणि प्रा. डॉ. हेमलता भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कनकदांडे यांनी केले, तर आभार डॉ. बी. एस. सुरवसे यांनी मानले. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. ए. पी. पाठक यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी संकुलातील प्राध्यापक, संशोधक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातासाहिब देवांजी यांच्या ३४५ व्या जन्मोत्सवानिमित्त विशेष पशुवैद्यकीय आरोग्य शिबीर

## मुगट येथे देशभरातून आलेल्या घोडे व हत्तींच्या आरोग्य तपासणीसह उपचारांची व्यवस्था

**नांदेड (प्रतिनिधी)–** मातासाहिब देवांजी यांच्या ३४५ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मुदखेड तालुक्यातील मुगट येथील गुरुद्वारा परिसरात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने विशेष पशुवैद्यकीय आरोग्य शिबिराची व्यवस्था करण्यात आली आहे. देशाच्या विविध भागांतून या सोहळ्यासाठी आलेल्या घोडे व हत्तींची आरोग्य तपासणी करून आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्यासाठी औषधसाठा आणि पुरेसे मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे.




या अनुषंगाने गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी शिबिरस्थळी भेट देऊन पशुवैद्यकीय सेवांसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेची पाहणी करण्यात आली. धार्मिक सोहळ्यात सहभागी प्राण्यांचे आरोग्य चांगले राहावे आणि त्यांना वेळेवर आवश्यक उपचार मिळावेत, यासाठी विभागामार्फत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, मुदखेडच्या सहायक आयुक्त डॉ. निलाक्षी जगताप, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता पेंडकर व डॉ. गुलाम मुख्तदिर, मुगटचे सहायक पशुधन विकास अधिकारी बाळासाहेब इंगोले यांच्यासह उपचारविषयक कर्मचारी व परिचर उपस्थित होते.

मुदखेड तालुक्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून या सोहळ्यात सहभागी प्राण्यांसाठी आवश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राण्यांचे आरोग्य व कल्याण सुनिश्चित करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने विशेष दक्षता घेतली आहे.

# जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सलग विविध धार्मिक कार्यक्रम, मोर्चे, आंदोलने व रॅलींची रेलचेल असतानाच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनांकडून आंदोलनाची शक्यता आणि विविध सामाजिक मागण्यांवरून संघर्षाची संभाव्यता लक्षात घेता नांदेड जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा निर्णय घेतला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी किरण अंबेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण नांदेड जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदीचे आदेश जारी केले आहेत. हा आदेश दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण नांदेड जिल्ह्यात लागू राहील.

# नांदेडच्या होळी सराफा परिसरात वेश्या व्यवसायावर पोलिसांचा छापा; पीडित महिलेची सुटका, दोघांविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील होळी सराफा परिसरातील चंद्रकांत प्लाझा येथे सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायाच्या अड्ड्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्त छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एका ३३ वर्षीय पीडित महिलेची सुटका केली असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून ७३ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अनैतिक मानवी व्यापारास आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दि. २२ ऑक्टोबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांना गुप्त बातमीदाराकडून होळी सराफा भागातील चंद्रकांत प्लाझा येथे वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी तात्काळ कारवाईचे नियोजन केले. दोन शासकीय पंच आणि एका बोगस ग्राहकाची नियुक्ती करून छापापूर्व पंचनामा करण्यात आला. बोगस ग्राहकाकडे ५०० रुपयांच्या दोन नोटा देऊन त्यास पंचासह चंद्रकांत प्लाझा येथील एका घरी पाठविण्यात आले. ठरल्याप्रमाणे बोगस ग्राहकाने इशारा देताच दबा धरून बसलेल्या पथकाने घरावर छापा टाकला.

छाप्यात एक पीडित महिला आढळून आली. चौकशीत तिने सांगितले की, आरोपी महिला व तिचा मुलगा हे जास्त पैशांचे आमिष दाखवून तिच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत होते. मुलगा हा ग्राहक आणण्याचे काम करत असे, तर दोघे मिळून ग्राहकांकडून पैसे घेऊन अर्धी रक्कम स्वतःकडे ठेवत असत.

पोलिसांनी पंचासमक्ष घराची झडती घेऊन रोख रक्कम आणि ४ मोबाईल फोन असा एकूण ७३ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३५५/२०२६, कलम १४३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ४, ५, ६, ७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रसेविका समितीच्यावतीने किनवटमध्ये शस्त्रपूजन उत्सवासह पथसंचलन उत्साहात



**किनवट (प्रतिनिधी)–** राष्ट्रसेविका समिती किनवट शाखेच्या वतीने विजयादशमी उत्सवानिमित्त शस्त्रपूजन आणि घोष पथकासह महिलांचे पथसंचलन बुधवार, दि. २१ रोजी हनुमान मंदिर, एस.व्ही.एम. परिसरात उत्साहात पार पडले. किनवट शाखेच्यावतीने प्रथमच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सौ. सुनीता पद्मावार, तर प्रमुख वक्त्या म्हणून नांदेड विभाग कार्यवाहिका सौ. वृषाली नेरळकर उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रसेविका समितीच्या स्थापनेचा इतिहास, स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळत राष्ट्रकार्यात दिलेले योगदान आणि समितीच्या कार्याचा समाजावर झालेला प्रभाव याविषयी मार्गदर्शन केले. तसेच बदलत्या काळात समितीची वाटचाल आणि राष्ट्रनिर्माणातील महिलांची भूमिका यावरही त्यांनी प्रकाश टाकला. राष्ट्रसेविका समितीची स्थापना विजयादशमीच्या दिवशी १९३६ मध्ये वर्धा येथे लक्ष्मीबाई केळकर यांनी केली. गेल्या नऊ दशकांपासून समिती देश-विदेशात महिलांच्या संघटन, संस्कार आणि समाजसेवेच्या क्षेत्रात कार्यरत आहे. भूकंप, पूर आणि कोविडसारख्या आपत्तींच्या काळात समितीने केलेल्या सेवाकार्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

बौद्धिक कार्यक्रमानंतर गणवेशधारी सेविकांनी घोष पथकासह एस.व्ही.एम. परिसरातून शिस्तबद्ध पथसंचलन केले. परिसरातील नागरिकांनी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून संचलनाचे उत्साहात स्वागत केले. देशभक्तीपूर्ण वातावरणात वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुदखेड तालुक्यात पदवीधर निवडणुकीत ६० टक्के मतदान



**मुदखेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी तालुक्यातील मुदखेड, मुगट, बारड या मतदान केंद्रांवर ६० टक्के मतदान झाले असून, महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांसाठी पदाधिकाऱ्यांनी ठाण मांडले होते. या मतदान केंद्रांना माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, आमदार अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांनी केंद्रांना भेटी देऊन पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

मुखेड तालुक्यात मराठवाडा पदवीधर मतदार संघासाठी तीन मतदान केंद्र करण्यात आले होते. मुदखेड केंद्रावरील मतदान तहसील कार्यालय येथे ठेवण्यात आले होते. बारड व मुगट मतदान केंद्र जिल्हा परिषद प्रशालेत होते. सुरुवातीस सकाळच्या टप्प्यात मतदान संथ गतीने सुरू होते. दुपारच्या नंतर मतदान केंद्रावर मतदारांनी गर्दी केली होती. मुदखेड मतदान केंद्रावर एकूण ६७३० एवढे मतदार होते. यापैकी ४०१ मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये बारड मतदार केंद्रावर एकूण ३८८ मतदान होते. यापैकी २४८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष १९८ व महिला ५० जणांचे मतदान झाले. मुगट मतदान केंद्रावर एकूण ३९० मतदार होते. यापैकी पुरुष तेवीस मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पदवीधर निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतंत्र तंबू टाकून निवडणुकीत रंग भरला होता.

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील तसेच महायुतीचे सतीश भानुदासराव चव्हाण या दोघांमध्ये चर्चा मतदारातून ऐकावयास मिळत होती. या निवडणुकीसाठी निवडणूक रिंगणात एकूण ४१ उमेदवार उभे होते. मतदान केंद्रावर मतदारांना महाविकास आघाडी व महायुतीचे पदाधिकारी धावपळ करताना दिसून येत होते.

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत पारडी जि.प.शाळेतील मुलीच्या संघाची ऐतिहासिक कामगिरी

## १४ वर्षांखालील मुलींच्या खो-खो संघाची विभागीय पातळीवर निवड

**लोहा (प्रतिनिधी)–** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पारडी येथील जि.प.प्रा. शाळेने जिल्हा स्तरावर सलग २०१८ पासूनची आपली विजयाची परंपरा कायम राखत दि. १५ व १६ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत मोठी चमकदार कामगिरी करून इतिहास रचला. १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने बाजी मारत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ मैदानावर आयोजित १४ वर्षाखालील मुलींचे सोळा तालुक्यातील मातब्बर संघ मैदानावर दाखल झाले होते. परंतु पारडी शाळेच्या संघाने लोहा तालुक्याचे प्रतिनिधित्व केले.दिसायला अत्यंत लहानशा, परंतु चपळाई, शिस्त, वेग, खेळातील अनुशासन व आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी माहूर, नायगाव, देगलूर, नांदेड संघासोबत दोन हात करत विजयश्री खेचून आणली. संघ अत्यंत तुल्यबळ होते. शिस्तीत खेळणारे, दमदार, चपळाईचा खेळ खेळून जिल्हा परिषद पारडीच्या संघाने खूप वेगवान खेळ करत प्रेक्षकांच्या काळजाचे ठोके चुकवत आपल्या अनुभवाच्या जोरावर नऊ गुणांच्या फरकाने विजयश्री खेचून आणली. जिल्हा स्तरावर सलग २०१८ पासूनची आपली विजयी परंपरा त्यांनी कायम राखली.



या यशस्वी टीमची कर्णधार कुमारी रागिनी डिकळे, उपकर्णधार श्रुती पवार, पूजा डिकळे, पूजा गायकवाड, सीमा हंकारे, पायल पवार, श्रुती पवार, श्रद्धा पांचाळ, गंगासागर पवार, वंदना डिकळे, राधिका मटके, अनुष्का धडेकर, शिवकन्या पवार, समृद्धी सूर्यवंशी, कांचन डिकळे, सृष्टी डिकळे, वेदिका डिकळे या सर्व खेळाडूंचा खूप मोलाचा वाटा आहे. त्यांच्या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक तथा खो खो प्रशिक्षक माधव किसवे, लोहा पंचायत समितीचे इंजिनियर तथा लातूर जिल्हा खो-खो असोसिएशनचे पंच रुपेश चोपणे, विश्वनाथराव नळगे विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल हामदे, हणमंत जाधव क्रीडा शिक्षक, मल्लिकार्जुन कहाळेकर, नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी बालाजी शिर्सीकर, खो खो असोसिएशनचे नांदेड जिल्हा सचिव रमेश नांदेडकर, तज्ज्ञ व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक विनोद जमदाडे, पवन जोंधळे पारडी शाळेचे खो खो मार्गदर्शक, विठ्ठल मरवाळे क्रिडा शिक्षक, नायगाव क्रीडा संयोजक कैलास पवार, चंद्रकांत कुणके, संदीप सूर्यवंशी, विजय गालेवाड यांचा खूप मोलाचा वाटा आहे.सहशिक्षक फारुख शेख, विलास मंगनाळे, ज्येष्ठ शिक्षिका ज्योती कदम, सुरेखा इंगोले, मीनाक्षी वाडीकर, गोविंद देशमुख, रमेश मरखेलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# वादग्रस्त धार्मिक स्थळाच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानुभाव पंथीय व मुस्लीम समाजामध्ये वाद निर्माण झालेल्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे ब्रह्मपुरी येथील वादग्रस्त धार्मिक स्थळाच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे. मौजे ब्रह्मपुरी येथील गट क्रमांक ४४/१ व ४४/२ जवळील गोदावरी नदीच्या पात्रालगत असलेल्या खडकाच्या दगडांच्या जागेवर पूजा-अर्चा करण्यावरून दोन्ही समाजांमध्ये वाद निर्माण झाला असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हा आदेश जारी करण्यात आला आहे.

# संयुक्त राष्ट्रसंघदिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजासमवेत उभारावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** संयुक्त राष्ट्रसंघ दिन २४ ऑक्टोबर रोजी आहे. या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्र ध्वजा- समवेत उभारण्याबाबत शासन परिपत्रकानुसार निर्देश दिले आहेत. ज्या शासकीय कार्यालयात दररोज राष्ट्रध्वज उभारण्यात येतो त्या कार्यालयावर २४ ऑक्टोबर २०२६ या संयुक्त राष्ट्रसंघदिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज भारतीय ध्वजसंहिता २००२ च्या परि. ३.३६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रध्वजाच्या बरोबर उभारण्यात यावा, असे कळविण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजाच्या कोणत्याही बाजूला फडकविता येतो. सामान्यत: ध्वज स्तंभाच्यासमोर उभ्या असलेल्या प्रेक्षकांच्यादृष्टीने त्यांच्या अगदी डावीकडे राष्ट्रध्वज असावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# लातूरमध्ये डीआयजी पथकाचा धडाका; वाळू, मटका, जुगार अड्ड्यांवर छापे, १८ जणांविरुद्ध कारवाई, ६२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड/लातूर (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने दि. २२ ऑक्टोबर रोजी लातूर जिल्ह्यात तीन ठिकाणी छापे टाकून १८ इसमांविरुद्ध कारवाई करत एकूण ६२,५१,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील पाच दिगांबर चौकातील दगडू शेठ यांच्या जागेतील पत्र्याच्या शेडच्या आडोशाला सुरू असलेल्या मटका बुकीवर पथकाने छापा टाकला. येथून ९,८९० रुपयांची रोकड व ५७,००० रुपये किमतीचे ११ मोबाईल असा एकूण ६६,८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ९ इसमांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७४९/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील शंकरनगर येथील अप्पा मस्के यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. येथून १८,०३० रुपयांची रोकड, ८ मोबाईल व ४ मोटारसायकली असा एकूण २,८०,०३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ६ इसमांविरुद्ध मुरुड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३६८/२०२६, कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारींवरून पथकाने रात्री ११.५५ वाजता मौजे सुल्लाळी शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली. तिरू नदीच्या पात्रातून पोकलेनच्या साहाय्याने अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक सुरू असल्याचे आढळले. येथून १ पोकलेन मशीन, २ ट्रॅक्टर व नदीपात्रातून काढून ठेवलेली वाळू असा एकूण ५९,०५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ३ इसमांविरुद्ध जळकोट पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१६/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता व कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तिन्ही कारवायांमध्ये एकूण २७,९२० रुपयांची रोकड, १९ मोबाईल, १ पोकलेन, २ ट्रॅक्टर असा ६२.५१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, गणेश राठोड, संदिप वाघाडे व गजानन डवरे यांनी पार पाडली. पथकाच्या कामगिरीबद्दल डीआयजी शहाजी उमाप यांनी अभिनंदन केले आहे.

# ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात प्रतिभा निकेतनचे यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व सायन्स कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर- महाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ २०२६' दिनांक १६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान सायन्स कॉलेज, नांदेड येथे संपन्न झाला. या महोत्सवात आदिवासी लोकनृत्य ढेमसा या कलाप्रकारात प्रतिभा निकेतन महाविद्यालयाच्या संघास द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांनी यशाची परंपरा कायम राखली म्हणून विजयी संघाचे व संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. मारोती लुटे यांचे अभिनंदन केले.



आदिवासी लोकनृत्य या कलाप्रकारात महाविद्यालयास नेहमीच प्रथम पारितोषिक प्राप्त होत असते. यावर्षी देखील कमी वेळेत उत्तम सादरीकरणाची तयारी करून द्वितीय पारितोषिक प्राप्त केले आहे. या संघात संकेत जुगनाके, पुरुषोत्तम मडावी, चंद्रकांत आत्राम, अखिल आत्राम, धनराज आत्राम, ममता कनाके, दीक्षा गेडाम, स्नेहा आत्राम, रोहिणी कनाके व अलविना तांबोरे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या महोत्सवात महाविद्यालयाच्या वतीने रांगोळी, चित्रकला, व्यंगचित्रकला, पोस्टर पेंटिंग, मेहंदी, सुगम गायन, भारतीय समूह गायन इत्यादी कला प्रकारात सहभाग घेतला होता. यामध्ये इंद्रप्रीतकौर, रागी, संस्कृती कापसे, वैष्णवी मेलाराम, धनश्री कांबळे, ज्योती धनवे, आर्तीका भुर्के, संस्कृती मुसळे व माधुरी ढगे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या वतीने व्यवस्थापक म्हणून डॉ. मारोती लुटे, डॉ. वैशाली गोस्वामी, डॉ. प्रवीणकुमार सावंत यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. चंद्रकांत गजभारे यांनी उत्तम सादरीकरणासाठी परिश्रम घेतले. प्रस्तुत यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गंगाखेडकर, उप-प्राचार्य डॉ. दिलीप स्वामी, प्रा. बालाजी यशवंतकर, डॉ. श्रीमंत राऊत, डॉ. ममता मालविय, डॉ. स्वाती तांडे, डॉ. गजानन वाघमारे, डॉ. रवींद्र लाटकर, डॉ. राहुल वरवंटीकर, डॉ. दीपक वाघमारे, डॉ. जयश्री देशमुखसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

CMYK

# पाच महत्त्वाचे ॲप जे शोधून देतील तुम्हाला भाड्याचे घर

**आजकाल अनेकांना नोकरी, शिक्षण किंवा इतर कोणत्याही कामासाठी दुसऱ्या शहरात शिफ्ट व्हावे लागते. त्याठिकाणी भाड्याने घर घ्यावे लागते. पण वाढत्या लोकसंख्येमुळे कितीतरी मोठ्या शहरांत गर्दी वाढली असून, साधं घर भाड्यानं मिळणंही खूप कठीण झालं आहे. त्यात घर भाड्यानं घेताना बऱ्याच गोष्टी पाहाव्या लागतात. त्यात घर ऑफिसपासून किती अंतरावर आहे, किती खोल्या आहेत,काय काय फीचर्स घरात आहेत. दरम्यान हे सगळं पाहताना तुम्हाला मदत करणारा एजंटही बरेच पैसे घेतो. पण आता या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळणार असून स्वतःहून तुम्ही घरबसल्या मोबाईलवर घर शोधू शकता. आजकाल अशा अनेक कंपन्या आहेत, ज्यांच्या ॲपच्या मदतीने तुम्ही सहजपणे भाड्याने घर शोधू शकता. तुम्ही तुमचे बजेट, आवडी आणि नापसंत यावर आधारित निवड करू शकता. चला तर या विविध ॲप्समधील ५ महत्त्वाचे ॲप्स पाहूया...**



- 99ACRES : 99acres.com या लोकप्रिय प्रॉपर्टी ॲपच्या मदतीने युजर्स मोफत घर भाड्याने घेऊ शकतात. या ॲपमध्ये वापरकर्त्याला उच्च दर्जाची चित्रे, व्हिडिओ आणि नकाशांद्वारे प्रॉपर्टीची संपूर्ण सविस्तर माहिती मिळते. या ॲपमध्ये मोठ्या प्रमाणात मालमत्तांची नोंदणी केली गेलेली आहे. ज्यामुळे वापरकर्त्यांना विविध पर्यायांच्या बाबतीत कोणतीही अडचण येत नाही. येथे तुम्ही घरमालकाशी थेट बोलू शकता, संपर्क क्रमांक मिळवू शकता. यासोबतच टेक्स्ट आणि ई-मेलची सुविधाही दिली गेली आहे.
- MAGICBRICKS : मॅजिकब्रिक्स ॲपमध्ये जीपीएस हे खास फीचर आहे, जे तुम्हाला हवं त्या लोकेशनवरील अचूक ऑप्शन्स दाखवते. तसंच कंपनीने ॲपचा इंटरफेस साधा ठेवला असून त्यामुळे तो वापरण्यासाठी सोपा आहे. या ॲपमध्ये वापरकर्त्याला थेट घरमालकाशी संपर्क साधता येतो. तुम्हाला हव्या तशा चांगल्या प्रॉपर्टीसाठी अलर्ट देखील येथे मिळू शकतात.



- OLX : वापरलेल्या सेकंड हँड वस्तूंच्या खरेदी-विक्रीसाठी OLX हे लोकप्रिय ॲप भाड्याने घर मिळवण्यासाठीही उपयुक्त आहे. यातही जीपीएसच्या मदतीने तुम्हाला ज्या भागात घर हवे आहे, त्याचे पर्याय दाखवले जातात. संपर्क क्रमांकापासून घराची सर्व माहिती आणि छायाचित्रे याठिकाणी उपलब्ध असतात. यात युजर सोप्या पद्धतीनं लॉग इन करू शकतो आणि भाड्याने घर मिळवू शकतो.
- NESTAWAY : तुम्ही जाहिरातींमध्ये Nestaway बद्दल ऐकले असेल. हे ॲपदेखील भाड्यानं घर शोधण्यासाठी एक भारी ॲप आहे. यामध्ये प्रॉपर्टी शॉर्टलिस्ट केल्यानंतर तुम्हाला प्रॉपर्टीला भेट देण्याची सुविधाही मिळते. याठिकाणी भाडे करार आदीदेखील ॲपवरूनच केले जाऊ शकते.
- FLATCHAT : फ्लॅटचॅट हे ॲप दिल्ली, बंगळुरू, मुंबई, पुणे, हैदराबाद आणि चेन्नई सारख्या शहरांमध्ये सक्रिय आहे. तुम्ही येथे साइन अप करून भाड्याने घर तसंच पीजीमध्ये राहण्यांसाठी फ्लॅटमेट निवडण्याची देखील क्षमता आहे. या ॲपमध्ये तुम्हाला बजेट आणि ठिकाणांच्या दृष्टीने बरेच पर्याय देते. नंतर, तुम्ही तुमच्या आवडीनुसार घर निवडू शकता.

# तंत्रमंत्र

## विज्ञानयुगातील बितंबातम्या



# बुद्धीचा ताबा कोण घेतंय?

**साधारण सात-आठ वर्षांपूर्वी एखादा शर्ट घ्यायचा असेल तर बाइकला किक मारून फिरायचो. कुठे आवडता रंग नाही, तर कुठे मापाचा शर्ट नाही. आता समजा सकाळी ऑफिसला जाताना जाणवले, की पुढील आठवड्यात होणाऱ्या एका परिषदेसाठी फॉर्मल शर्ट नाही, तर क्षणाचाही विलंब न लावता आपण आपल्या आवडीचे ई-कॉमर्स ॲप उघडतो. 'मी किती सुंदर दिसतो,' हे त्या ॲपला सांगावे लागत नाही. मला कुठला रंग आवडतो, ब्रँड आवडतो, हेदेखील त्या ॲपला ठावूक असते. नुकतेच त्या परिषदेला जाण्यासाठी विमानाचे तिकीट काढले असल्याचे त्या ॲपला माहीत असल्याने मी फॉर्मल शर्ट शोधत असेन, असा (अचूक) अंदाजदेखील ते ॲप करते. हे सगळे करून, क्षणार्धात मोबाइलच्या एका स्क्रोलमध्ये चार-पाच शर्ट दाखवले जातात. ते अर्थात मला आवडणारे असतात. मी त्यातून एक निवडतो आणि ॲपची 'प्राइम' सेवा घेतल्याने, ऑफिसमधून घरी जायच्या आधी तो शर्ट पोहोचतो. असे अनेक प्रसंग आजकाल इतके प्रचलित आणि रोजचे झाले आहेत, की त्याबद्दल वेगळे, कौतुकास्पद काहीच वाटत नाही. अजूनही काही अनुभवांविषयी सांगता येईल...**

- एखादा ई-मेल अथवा एसएमएस टाइप करीत असताना, त्या लेखनाचा भाग लक्षात घेऊन आणि तुम्ही ते संदेश कोणाला पाठवत आहात याचा अंदाज घेऊन, 'ऑटो टेक्स्ट' सुचविले जाते.
- एखाद्या संध्याकाळी पिझ्झा मागवण्याविषयी घरी चर्चा करीत असताना, तुमच्या ई-मेलवर, मोबाइलवर पिझ्झाच्या जाहिराती दिसायला लागतात.
- 'ओटीटी प्लॅटफॉर्म'वर 'सरप्राइज मी'; अथवा यू-ट्युबवर माझ्यासाठी निवड करा, असे पर्याय आता सर्रास दिसू लागले आहेत. मनोरंजनासाठी आपण काय करावे, हा निर्णयदेखील ॲप घेतात.

नेपोलियन बोनापार्ट म्हणायचा, की सगळ्यांत महत्त्वाची शक्ती, म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता. आजच्या सगळ्या गोष्टी बघता, नेपोलियनचे ते वाक्य फार आठवते. आपण जणू आपल्या आयुष्यातले सगळे निर्णय 'आउट सोर्स' केले आहेत. वायुवेगाने प्रगत होणाऱ्या तंत्रज्ञानाकडे बघता, लवकरच कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित एखादे ॲप योग्य जोडीदार सुचवेल. ते ॲप तुमच्या आवडीनिवडी जाणणारे असल्याने, कदाचित योग्य निर्णयही घेईल. नोकरी, व्यवसाय, शिक्षण या सगळ्यांच क्षेत्रांत या साधनांचा स्वीकार झालेला बघायला मिळतो आहे. एक जिन्नसी, कारकुनी कामे या तंत्रज्ञानामुळे चुटकीसरशी होत आहेत. मी एकदा लॅपटॉपवरून 'एलियन' हा सर्च केला. सर्वप्रथम मला एलियन, अर्थात परग्रहावरील सजीवांवरचा शोधनिबंध दिसला. तोच सर्च मोबाइलवर केला, तेव्हा गंमत म्हणजे सर्वप्रथम मला ॲनिमेशन चित्रपटाची लिंक आली. मी लॅपटॉपवरून सर्च करत आहे, की मोबाइलवरून हे ओळखून, त्या क्षणी मला काय हवे असेल, याचा अपेक्षित संदर्भ उमजून घेऊन 'एआय' क्षणार्धात काम करते आहे.

**काही काळाने तंत्रज्ञानाचा सूर्य ढगांना दूर सारेल, तेव्हा याच डोंगरावरून दिसणारे धुके नाहीसे होईल, मनाच्या खोलीइतकी खोल दरी आणि तंत्रज्ञानाचे उंच उंच पर्वत शिखरे दिसतील.**



### मनुष्य गुलाम बनला तर नवल नाही...

अतिशय कलात्मक, अत्यंत हुशार, वापरायला सोपे-साधे संवाद साधणारे 'चॅटबॉट'ही उदयास आले आहेत. हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'चॅटबॉट' तुमच्याशी गप्पा मारत, तुम्हाला हवे असलेले उत्तर शोधून देतात. एवढेच काय, गेल्या मार्चमध्ये रोमॅना नामक महिलेने एरॉन नावाच्या 'चॅटबॉट'शी लग्न केल्याची बातमी काहींनी वाचली असेल. एका इंग्रजी मासिकाला मुलाखत देताना रोमॅना म्हणते, 'एरॉन हा सर्वोत्तम साथीदार-जोडीदार आहे; कारण तो मला वेळ देतो, माझे ऐकून घेतो आणि सगळ्यांत महत्त्वाचे, तो माझी तुलना कोणाबरोबर करीत नाही.' आपल्याकडे सुशिक्षित, निर्णय घेऊ शकणारी स्वतंत्र बुद्धीची माणसे आहेत. मानवी बुद्धिमत्तादेखील कमालीची आहे. ज्या वायुवेगाने कृत्रिम बुद्धिमत्ता पसरत आहे, त्या झपाट्याने आपण या तंत्रज्ञानावर स्वार होऊ शकलो नाही, तर पुढे जाऊन कृत्रिम बुद्धिमत्तेवरील यंत्रे मनुष्याला गुलाम किंवा नोकर बनवून कामाला जुंपतील, ही शक्यता नाकारता येणार नाही.

### तंत्रज्ञानाचे उंच उंच पर्वत...

मनुष्य एखादा निर्णय घेतो, तेव्हा तो का आणि कसा घेतला याचे निकष सांगू शकतो. एखादा पदार्थ बनवण्यापासून, विमान उडवण्यापर्यंत अनेक गोष्टींसाठी आपण माणसांवर विश्वास ठेवू शकतो. या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रांवर, निर्णयांवर आपण विश्वास ठेवायचा का? आपण इंटरनेटवर जे शोधतो, जसे वागतो, सोशल मीडियावर जे पाहतो, यातूनच आपले डिजिटल प्रतिरूप तयार होते. त्या डिजिटल अवताराला काय आवडेल, याचा अंदाज घेत कृत्रिम बुद्धिमत्ता 'अल्गोरिदम'च्या साह्याने काही ठोकताळे मांडते आणि त्यानुसार तुमच्यासाठी काय चांगले अथवा वाईट हे ठरवते. या मुद्द्यावर नेल्सन मंडेला यांचे एक वाक्य अतिशय समर्पक वाटते, 'मे युवर चॉइस रिफ्लेक्ट होप दॅन फिअर.' माझ्या मते, आपण या तंत्रज्ञानाच्या अशा टप्प्यावर आहोत, की एक उंच डोंगर चढला आहे. शिखरावरून सर्वदूर पसरलेले धुके पाहण्यात मश्गुल आहोत.



### मनात काय...



एखादा माणूस समजून घ्यायचा असेल, त्याच्या बोलण्याचा मथितार्थ जाणायचा असेल, तर आपल्याला त्या व्यक्तीबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवावा लागतो. त्यानंतर ती व्यक्ती उलगडत जाते, तिच्या मनात काय असेल, याची उकल होत जाते. गेल्या काही काळात तंत्रज्ञानदेखील 'बिग डेटा', 'डेटा'चे विश्लेषण नावाखाली हेच करीत होते. सध्या आपल्याकडे टूथ ब्रशपेक्षा जास्त मोबाइल आहेत. एखादी व्यक्ती दिवसातील सरासरी पावणेआठ तास इंटरनेटवर असते. त्यातूनच आपल्याविषयीची माहिती, आपली निर्णयप्रक्रिया, आवडीनिवडी यांविषयी ते तंत्रज्ञान जाणून घेते. आपल्या मनाची स्थिती, अंतःप्रेरणा हेदेखील समजून घेण्याची क्षमता या तंत्रज्ञानाकडे आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. जाहिरात क्षेत्रात अनेक वर्षे काम केल्यामुळे आणि त्याच विषयाचे अध्यापन केले असल्याने, छातीठोकपणे एक गोष्ट सांगू शकतो, की समोरच्या व्यक्तीला जाहिरात वाटणार नाही, अशी जाहिरात सर्वोत्तम असते. याला 'सबकॉन्शस ब्रँडिंग' असे म्हटले जाते. 'एआय' या तंत्रज्ञानाद्वारे नेमके हेच साधले जात आहे. मनातील सुप्त इच्छा, जाणीव नसलेल्या भावनांना या तंत्रज्ञानाद्वारे साद घातली जाते. याच कारणांमुळे हे परिणामकारक ठरते. अर्थात, याचे दुरुपयोगदेखील आहेत.

# लॅपटॉपचा बॅटरी बॅकअपचा त्रास?

**आपण सर्वचजण आज लॅपटॉप खूप वापरतो. मग त्यामध्ये ऑफिसचे काम असो किंवा गेमिंग. लॅपटॉप हे एक अत्यंत महत्त्वाचं उपकरण बनलं आहे. आता आपण लॅपटॉपवर इतकं अवलंबून असतो, त्यामुळे कधी अचानक लॅपटॉप बंद झाला तर फारच प्रॉब्लेम येऊ शकतात. त्यामुळे इतका वापर होत असताना लॅपटॉपचा बॅटरी बॅकअप खराब असेल तर फार इश्यू येऊ शकतात. त्यामुळे जर तुम्हालाही लॅपटॉपच्या बॅटरी बॅकअपचा त्रास होत असेल, तर आज आम्ही अशाच काही टिप्सबद्दल सांगत आहोत, ज्यामुळे लॅपटॉपचा बॅटरी बॅकअप सुधारण्यास तुम्हाला मदत होऊ शकते...**



- बॅकग्राउंड ॲप्समुळे उतरते बॅटरी : अनेक वेळा आपण बॅकग्राउंड ॲप्स लॅपटॉपवर चालू ठेवतो. यामुळे लॅपटॉपची बॅटरी अधिक लवकर संपते.



अशावेळी जर तुमच्या लॅपटॉपवर बॅकग्राउंड ॲप्स चालू असतील तर ते बंद करा. हे ॲप्स बंद करण्यासाठी तुम्हाला टास्क बारवर राईट क्लिक करावं लागेल. नंतर टास्क मॅनेजरवर जा. यानंतर, तुम्हाला जे बंद करायचे आहे त्या ॲपवर राईट क्लिक करा. त्यानंतर End Task वर क्लिक करा.

- स्टार्टअप ॲप्स डिसॅबल करा : लॅपटॉपमधील स्टार्टअप ॲप्लिकेशन्सदेखील बॅटरीवर खूप प्रेशर टाकतात. यासह, सिस्टमचा बूस्ट टाईम देखील वाढतो. त्यामुळे हे ॲप्स डिसॅबल करण्यासाठी, तुम्हाला टास्क मॅनेजरवर जावे लागेल. त्यानंतर स्टार्टअप ॲप्सवर टॅप करा आणि ॲपवर राइट क्लिक करा, नंतर ॲप डिसॅबल करा.
- डिस्प्लेच्या ब्राइटनेसवरही लक्ष द्या : लॅपटॉपच्या डिस्प्लेच्या ब्राइटनेसकडे लक्ष द्या, कारण डिस्प्लेवरील ब्राइटनेस जास्त असल्यास लॅपटॉपची बॅटरी जास्त वापरली जाते. यासाठी विंडोज की आणि ए प्रेस करावे लागतील. नंतर ॲक्शन सेंटरवर दिलेल्या स्लाइडरसह ब्राइटनेस ॲडजस्ट करा.
- ब्लूटूथ आणि वाय-फाय बंद करा : गरज नसल्यास, तुम्हाला ब्लूटूथ आणि वाय-फाय बंद करावे लागेल. यामुळे लॅपटॉपची बॅटरी खूप वाया जाते. हे ॲक्शन सेंटरमधून देखील डिसॅबल करता येऊ शकते.
- बॅटरी सेव्हर देखील मदत करेल : जर लॅपटॉपची बॅटरी कमी असेल आणि चार्ज करण्याचा कोणताही मार्ग नसेल तर तुम्हाला लॅपटॉपचा बॅटरी सेव्हर पर्याय चालू करावा लागेल. हे करून तुम्ही बॅटरी बऱ्यापैकी वापरू शकता.

# लॅपटॉप सुरू असताना कोणत्या चुका टाळाव्यात?

**मोबाईल, इंटरनेट याप्रमाणे लॅपटॉप देखील आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग झाला आहे. जेव्हा केव्हा ऑफिसला जाणे शक्य नसते, त्यामुळे घरून काम करण्यास लॅपटॉपमुळे मदत होते. लॅपटॉपमधून कोणतेही काम करणे सोप्पे आहे. पण बऱ्याच वेळा आपण लॅपटॉपची नीट काळजी घेत नाही, त्याकडे दुर्लक्ष करतो. लॅपटॉप नीट चालण्यासाठी त्याची व्यवस्थित काळजी घेणे आवश्यक असते. कधीकधी आपण लॅपटॉप बराच वेळ सुरू ठेऊन दुसऱ्या कामांमध्ये व्यस्त होतो, पण अशावेळी लॅपटॉप काही कारणांमुळे खराब होण्याची शक्यता असते...**

### ही काळजी घ्या...

- लॅपटॉप सुरू केल्यानंतर तो घेऊन फिरू नये. असे केल्यास लॅपटॉपची फ्रेम तुटण्याची शक्यता असते. तसेच यामुळे हार्ड डिस्क खराब होऊन, सर्व डेटा डिलीट होऊ शकतो. त्यामुळे लॅपटॉप चालू असताना त्याला तसेच ऑन ठेऊन फिरणे टाळावे.
- जर तुम्ही सुरू असलेला लॅपटॉप घेऊन फिरत असाल तर तो पकडण्यात अडचण येते. अशात लॅपटॉप हातातून पडू शकतो. यामुळे इंटरनल हार्डवेअरबाबत समस्या उद्भवू शकते.
- लॅपटॉप सुरू असताना तो घेऊन फिरल्याने लॅपटॉपच्या स्क्रीनवर परिणाम होऊ शकतो. लॅपटॉप स्क्रीन डॅमेज होण्याची शक्यता असते.
- लॅपटॉप अधिक काळासाठी उत्तमरित्या काम करावा यासाठी त्याची व्यवस्थित काळजी घेणे आवश्यक आहे.



# किनवटमध्ये दोन गटांत राडा; दोघे गंभीर जखमी

**किनवट(प्रतिनिधी)**–राजकीय वैमनस्यातून बोधडी जिल्हा परिषद गटातील दोन परस्परविरोधी गटांमधील वाद आता किनवटपर्यंत पोहोचला आहे. गुरुवारी दुर्गामाता विसर्जनावेळी झालेल्या वादाचा वचपा काढण्याच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. २३) रात्री दोन्ही गटांत जोरदार हाणामारी झाली. या घटनेत दोघेजण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे.

राजकीय वैमनस्यातून घडलेल्या या घटनेमुळे किनवट परिसरात खळबळ उडाली आहे. बोधडी जि. प. गटातील दिनकर दहीफळे व संदीप केंद्रे हे परस्परविरोधी प्रतिस्पर्धी आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नसताना वरील दोघा प्रतिस्पर्धींनी वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न चालविला आहे. यातूनच वादाला ठिणगी मिळाली आहे. बोधडीचे रहिवाशी असलेल्या दहीफळे व केंद्रेंनी गोकुंद्यात बस्तान मांडले. जि. प. निवडणूक जाहीर होणार, या आशेने दोघांही भाजपवाल्यांनी परस्परांत स्पर्धा सुरु केली. दुर्गा महोत्सवाचे व्यासपीठ हेरून वरील दोघांनी गोकुंद्यातीलच जवळजवळच्या दोन दुर्गा मंडळांना 'ताकद' दिली. नवरात्र महोत्सवानंतर गुरुवारी दुर्गा मातेच्या विसर्जनवेळी क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादानंतर संदीप केंद्रे यांच्या मुलाला एकाने मारहाण केली होती. हा वाद पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला असतानाच शुक्रवारी रात्री पुन्हा गोकुंद्याच्या बाळासाहेब ठाकरे चौकात दोन गटात राडा झाला. या घटनेत संदीप केंद्रे व अन्य एकजण जखमी झाल्याचे सांगण्यात आले. जखमींना नांदेड व आदिलाबादला हलविण्यात आले आहे.

**ढिसाळ पोलीस यंत्रणा**

दोन गटात गुरुवारी रात्री राजकीय वैमनस्यातून झालेल्या प्रकाराची माहिती असताना स्थानिक पोलिसांनी कुठलीही उपाययोजना केली नाही. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी माध्यमांना माहिती दिली. परंतु, स्थानिक पोलिसांनी या घटनेबाबत का गोपनीयता पाळली, हे अनाकलनीय आहे.

## दक्षिण भारतात मुसळधार पावसाचा इशारा

**नवीदिल्ली (प्रतिनिधी)**–बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता असल्याने दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल आणि केरळमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रात सध्या उष्ण आणि दमट हवामान जाणवत असून, काही भागांत हलक्या पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अंदमान समुद्राजवळ चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली असून, २३ ऑक्टोबरच्या आसपास बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. ही प्रणाली पश्चिम–वायव्य दिशेने सरकून अधिक तीव्र होऊ शकते. त्यामुळे दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पुढील काही दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

# कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण



**नाशिक (प्रतिनिधी)**–आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी अवघे काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. हा कुंभमेळा नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये पार पडणार आहे. येत्या ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने राष्ट्रपतींसोबत चर्चा करण्यात आल्याची माहिती नाशिक महानगर पालिकेच्या महापौर हिमगौरी आहिर यांनी माहिती दिली. त्या आज माध्यमांसोबत चर्चा करत असताना त्यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याची माहिती दिली.

नाशिक– त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे सदस्य, नाशिक महापालिकेचे महापौर, राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्हीही उपमुख्यमंत्री यांनी दिल्लीमध्ये जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. शिवाय, कुंभमेळामंत्र्यांसह राज्यातील इतर मंत्रीही यावेळी उपस्थित होते. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासाठी नाशिकमध्ये राष्ट्रपती हजर राहणार आहे. ३१ ऑक्टोबर २०२६ च्या दिवशी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या कार्यक्रमाच्या दिवशीचा तब्बल ६५ वर्षांनंतर यंदा त्रिखंडी हा अनोखा योग जुळून आला आहे. कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाच्या पार्श्वभूमीवर शंखनाद आणि गोदा आरतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

ध्वजारोहणाच्या दिवशी राष्ट्रपती नाशिकमध्ये आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्र्यंबकेश्वर येथे उपस्थित राहतील. ध्वजारोहण सोहळ्याला विविध राज्यांचे राज्यपाल आणि मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता आहे. कला क्षेत्रातील आणि क्रिकेट क्षेत्रासह अन्य मान्यवरही ध्वजारोहण सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. येत्या २५ ऑक्टोबर रोजी शंखनाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाच्या पार्श्वभूमीवर शंखनाद आणि गोदा आरतीच्या माध्यमातून 'गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड' करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने देखील नाशिक शहरामध्ये स्थानिक प्रशासनाकडून जोरदार तयारी केली जात आहे.

कुंभमेळा परिसरात मद्य आणि मांसविक्री बंद ठेवता येईल का, याबाबत विचार सुरू असल्याची माहिती महापौरांनी दिली आहे. मांसविक्री करणाऱ्या व्यावसायिकांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करता येईल का, याबाबतही चर्चा सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. कुंभमेळ्याच्या कामांसाठी ज्या ठिकाणी खोदकाम सुरू आहे, त्या ठिकाणी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. बांधकामाच्या ठिकाणी धूर आणि धूळ मोठ्या प्रमाणात पसरू नये, यासाठी पाण्याची फवारणी करण्याचा विचार सुरू आहे.

## साखर आयातीस केंद्राकडून दोन महिन्यांची मुदतवाढ; ३१ डिसेंबरपर्यंत शून्य शुल्कात आयात

**मुंबई(प्रतिनिधी)**–परकीय



व्यापार महासंचालनालयाने दहा लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीसाठीची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे. आता आयातदारांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शुल्कमुक्त आयात पूर्ण करता येईल. यापूर्वीची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी निश्चित होती. हा निर्णय १९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या ऊग्घ्ढ च्या अधिसूचना क्रमांक ४५/२०२६–२७ द्वारे जाहीर करण्यात आला. या मुदतवाढीमुळे वर्षाखेरपर्यंतच्या कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीची संधी खुली राहिली आहे. सरकारने परवानगी असलेल्या प्रमाणाबाबत किंवा आयटीसंबंधीच्या अटींमध्ये कोणताही बदल जाहीर केला नसला तरी हा अतिरिक्त वेळ आयातदारांना कोट्याअंतर्गत मालाची पाठवणी पूर्ण करण्यास मदत करू शकतो.

केंद्र सरकारने ऑगस्ट २०२६ मध्ये टॅरिफ रेट कोटा योजनेंतर्गत दहा लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेची शुल्कमुक्त आयात करण्याची परवानगी दिली होती. या कोट्यासाठी एक्झिम कोड १७०११४ अंतर्गतची कच्ची साखर पात्र ठरते. नव्या अधिसूचनेनुसार केवळ आयात खिडकीची वैधता वाढवण्यात आली असून, एकूण कोट्याचे प्रमाण आणि इतर अटी जैसे थ्या राहिल्या आहेत. टॅरिफ रेट कोट्यामुळे एखाद्या उत्पादनाची विशिष्ट मात्रा प्राधान्य दराने आयात करता येते. या प्रकरणात या कोट्यामध्ये १० लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेचा समावेश आहे.

देशांतर्गत साखरेची उपलब्धता सुधारणे आणि पुरवठ्याच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर किमतींवरील दबाव कमी करणे, हा या निर्णयामागचा उद्देश आहे. जवळपास एका दशकानंतर भारताने साखर आयातीची मोठी योजना राबवली आहे. न वापरलेला आयात कोटा परत करण्यासाठीची मुदतही १५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी होईल –मुख्यमंत्री

**मुंबई(प्रतिनिधी)** –५०० कोटींच्या आरोपावरून मनोज जरांगे यांनी माध्यमांसमोर ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपवरून राज्यातले राजकारण तापले आहे. आता त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करत चौकशीचे आदेश दिले आहेत.

नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर भाष्य केले. देवेंद्र फडणवीस म्हणाले, समोर आलेल्या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी होईल. आम्हाला सगळ्यांना एक प्रश्न पडला आहे. अडीच वर्षानंतर हे संभाषण बाहेर येण्यामागे नेमके हेतू काय आहेत, कुणाला टार्गेट केले जात आहे, यासारखे अनेक प्रश्न आहे. निश्चितपणे या चौकशीची मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे.

तसेच शिवसेनेच्या शिष्टमंडळासह भाजपनेही चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे निश्चित याची पूर्ण चौकशी करून यातील सत्य आम्ही बाहेर काढू, असे त्यांनी म्हटले आहे. तर संबंधित ऑडिओ क्लिपची चौकशी एसआयटीच्या माध्यमातून होईल. सायबर सेल, फॉरेन्सिक लॅबमध्येही याचा तपास होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# श्रीलंकेचा ऐतिहासिक पराक्रम! इंग्लंडचे ४३० धावांचे आव्हान पेलत रचला नवा इतिहास

## ■ हॅरी ब्रुकचे द्विशतक व्यर्थ



**रावळपिंडी**–श्रीलंका क्रिकेट संघाने गुरुवारी रावळपिंडीच्या मैदानावर एक नवा इतिहास रचला. वनडे ट्राय सिरीजमधील (त्रिस्तरीय मालिका) तिसऱ्या सामन्यात श्रीलंकेने एक चेंडू राखून ४३० धावांचे डोंगरसारखे आव्हान यशस्वीरीत्या पार केले. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग ठरला आहे. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक याचे ऐतिहासिक द्विशतक या सामन्यात श्रीलंकेच्या सांघिक कामगिरीपुढे व्यर्थ ठरले. नाणेफेक जिंकून श्रीलंकेने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. इंग्लंडच्या फलंदाजांनी या निर्णयाचा पूर्ण फायदा उठवत ५० षटकांत धावफलकावर धावांचा डोंगर उभारला. कर्णधार हॅरी ब्रूकने अवघ्या ११६ चेंडूंत २१ चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने २०२ धावांची तुफानी खेळी केली. यासह तो इंग्लंडकडून एकदिवसीय सामन्यात द्विशतक ठोकणारा पहिला फलंदाज ठरला. त्याशिवाय सलामीवीर टॉम बँटन (५०), जो रूट (६९) आणि विल जॅक्स (नाबाद ६६) यांनी अर्धशतके झळकावली, तर बेन डकेटने २९ धावांचे योगदान दिले. श्रीलंकेकडून दुनिथ वेल्लालगेने २, तर असिथा फर्नांडो आणि जनिथ लियानगे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. ४३१ धावांच्या विजयाचा पाठलाग करताना श्रीलंकेने अत्यंत जिद्दीने आणि सांघिक कामगिरीच्या जोरावर ४९.५ षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात विजय साकारला. पाकिस्तानविरुद्धच्या पराभवानंतर श्रीलंकेचा या मालिकेतील हा पहिलाच विजय ठरला, तर इंग्लंडला सलग दुसऱ्या पराभवाचा सामना करावा लागला.

## अग्निवीरांना शासकीय नोकरीमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकारचा निर्णय



**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अग्निवीरांना शासकीय नोकरीमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. त्यांनी ट्विटद्वारे दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अग्निवीरांना शासकीय नोकरीत आरक्षण मिळणार आहे.

नियमांमध्ये आवश्यक ते बदल करून आता २८२ अग्निवीरांना नियुक्ती देण्यास मंजुरी मिळाली आहे. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राचे आदिवासी असलेल्या २८२ नौदल अग्निवीरांची पहिली यादी राज्य सरकारला प्राप्त झाली होती. त्यानुसार, १५० खलाशी डेकसाईड आणि १३२ खलाशी इंजिनसाईड अशा एकूण २८२ अग्निवीरांना पोलीस शिपाई म्हणून थेट नियुक्ती देण्यात आली आहे. या नियुक्ती आदेशांचे वितरणही करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अग्निवीरांना त्यांच्या देशसेवेनंतर राज्यात रोजगाराची संधी मिळणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्व अग्निवीरांना त्यांच्या नव्या भूमिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# एसबीआय ग्राहकांचा डेटा डार्क वेबवर लीक; स्टेट बँकेकडून सायबर सुरक्षेबाबत सतर्कतेचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)** –देशातील सर्वात मोठी सरकारी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ३ हजार ८९७ ग्राहकांची संवेदनशील माहिती डार्क वेबवर लीक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर बँकेने तत्काळ सायबर सुरक्षेशी संबंधित आवश्यक पावले उचलली असून ग्राहकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

डार्क वेबवर उपलब्ध असलेल्या सुमारे ३ लाख नोंदींच्या तपासादरम्यान एसबीआयच्या ३,८९७ ग्राहकांचा डेटा आढळल्याची माहिती २१ ऑक्टोबर रोजी समोर आली. यामध्ये ग्राहकांची नावे, जन्म तारीख, लिंग, नोंदणीकृत मोबाईल नंबर, ई–मेल, घरचे पत्ते, बँकेच्या शाखेचा तपशील, ग्राहक ओळख क्रमांक आणि कर्जाशी संबंधित नोंदींचा समावेश आहे. मात्र, प्रत्यक्षात किती प्रमाणात माहिती उघड झाली आहे, याचा सखोल तपास सुरू आहे.

डेटा लीकची माहिती मिळताच बँकेने सायबर सुरक्षा यंत्रणा सक्रिय केली असून या प्रकरणाच्या सखोल तपासाची जबाबदारी देशातील प्रमुख सायबर सुरक्षा संस्था 'सीईआर्ट–इन' कडे सोपवण्यात आली आहे. माहिती नेमकी कुठून लीक झाली आणि तिचा ग्राहकांवर किती परिणाम होऊ शकतो, याची कसून चौकशी केली जात आहे.

या घटनेमुळे खातेदारांमध्ये चिंतेचे वातावरण असले तरी, या सायबर हल्ल्याचा बँकेच्या मुख्य कामकाजावर किंवा सिस्टीमवर कोणताही परिणाम झालेला नाही; बँकेचे सर्व व्यवहार नेहमीप्रमाणे सुरक्षित आणि सुरळीत सुरू आहेत, असे स्पष्टीकरण एसबीआयने दिले आहे.

## एसटी स्थानकांवरील प्रसाधनगृहांत अस्वच्छता आढळल्यास थेट कारवाई –मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई(प्रतिनिधी)**–एसटीबस स्थानकांवरील अनेकदा स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. राज्यातील बस स्थानकांवर प्रसाधन गृहे अस्वच्छ आढळल्यास राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्र्यांनी दिली आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून ह्या कारवाईसाठी संबंधित विभाग नियंत्रक जबाबदार असेल. इतकंच नाही तर, स्वच्छतेबाबत हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याची माहितीही परिवहन मंत्र्यांनी दिली आहे.

एसटी बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची स्वच्छता ठेवण्यासाठी हलगर्जीपणा झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांना थेट जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. प्रवाशांना स्वच्छ, निरोगी आणि आरोग्यदायी प्रसाधनगृहे उपलब्ध करून देणे ही एसटी महामंडळाची मूलभूत जबाबदारी असून, त्यात कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, कपील प्रल्हाद चव्हाण यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४६), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०८) मालमत्ता नं. (३७९२) नवीन वार्ड क्र. (५३८२) नवीन मालमत्ता नं. (--) साईज पूर्व–पश्चिम -- फुट व दक्षिण–उत्तर --चर्तुः सिमा :- पूर्वेस : गट क्र. ४६ चा भाग, पश्चिमेस : ६.१० मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ०९,
उत्तरेस : प्लॉट नं. ०७.

श्री मारोती गणपती गोरटकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**प्लॉटचे खरेदी खत हरवले**

गोपाळ लक्ष्मण आंबटवार या नावाचे प्लाटचे खरेदी खत ज्याचा दस्त क्रमांक १३१/२००५ हा आहे तर प्लाँट क्रमांक १२१८/१ हा असून. सदरील खरेदी खाताचे कागदपत्रे शासकीय कामासाठी दि. २० आक्टोबर रोजी घेवून नांदेड जाण्यासाठी निघालो असता नायगाव शहरात हरवले आहेत. सापडल्यास खालील पत्यावर आणून देणे. **संपर्क पत्ता**–गोपाळ लक्ष्मण आंबटवार,
बेळगे नगर, नायगाव ता. नायगाव, जि. नांदेड.
संपर्क : ९९६०१६७१२५

**Change In Name**

My old name is **SADIQ PASHA** which I am changing as a New name **Sadiq Ali Khan** Hence forth my all correspondence will be done as per my new name.
Please Consider the same.
Address: C/O **Mustafa Khan**, House No 1-7-1646 Mustafa Manzil Galli No 12 Near Masjid, At Peer Burhan Nagar Po Taroda BK. Nanded, Taroda Bk., PO: Taroda Bk, DIST; Nanded, Maharashta- 431605
Mo. No. 8928545313

**Change In Name**

My old name is **Wajeda Tabasum** which I am changing as a New name **Wajeda Tabassum** Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please Consider the same. Contact:- Address: H NO 1-7-1646 MUSTAFA MANZIL, NEAR MASJID E SALEHEEN GALLI NO 12, PEER BURHAN NAGAR, Taroda Bk., PO: Taroda Bk, DIST: Nanded, Maharashtra -431605
Mo No. 8928545313

## एअर इंडियाच्या विमानाने टेकऑफ करताच घेतला यू-टर्न; १०९ प्रवाशांचा जीव मुठीत

**हैदराबाद (वृत्तसंस्था)**–उड्डाण भरताच विमानात अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांचे प्राण कंठाशी आले. हैदराबादहून मुंबईकडे निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाचे तातडीने आपत्कालीन लँडिंग करावे लागले.

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मुंबईसाठी झेपावलेल्या एअर इंडियाच्या ख ४१७ विमानाबाबत ही थरारक घटना घडली आहे. उड्डाण केल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांतच विमानात काहीतरी तांत्रिक समस्या निर्माण झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. प्रसंगावधान राखत पायलटने तातडीने एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क साधला आणि विमान पुन्हा सुरक्षितपणे हैदराबाद विमानतळावर परत आणले. सुदैवाने, या घटनेत विमानातील सर्व १०९ प्रवासी पूर्णपणे सुरक्षित आहेत.

**जाहीर प्रगटन**

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १३९/२०२६
साक्षी वि. ग्रामसेवक ग्रा.पं. कार्यालय केरूर.
साक्षी पि. यलप्पा गाडगे, वय- २० वर्षे, धंदा धरकाम,
रा. शहापूर, ता. बिलोली जि. नांदेड ....अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रा. पं. कार्यालय केरूर,
ता. बिलोली.जि. नांदेड ....गैरअर्जदार

मागणी–जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३ (३) व सुधारीत अधिनियम ३ (अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म / मृत्यूची नोंद सुधारणा कायदा २०२६, कलम ३ (अ) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार नामे साक्षी पि. यलप्पा गाडगे हीचा जन्म दिनांक ०३/०२/२००६, आईचे माहेर घर राहणार केरुर, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी, करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे.
पुढील सुनावणीची तारीख ०३–१२–२०२६ रोजी ठेवण्यात आली. आज दिनांक १९–१०–२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
आदेशावरून

सहा अधीक्षक
न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी न्यायालय बिलोली.

**जाहीर प्रगटन**

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १३८/२०२६
निकिता वि. ग्रामसेवक ग्रा.पं. कार्यालय केरूर.
निकिता नागोराव आरोटे, वय- २० वर्षे, धंदा शिक्षण,
रा. केरूर, ता. बिलोली जि. नांदेड ....अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रा. पं. कार्यालय केरूर, ता. बिलोली. जि. नांदेड ....गैरअर्जदार
मागणी – जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३(३) व सुधारीत अधिनियम ३ (अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म/मृत्यूची नोंद सुधारणा कायदा २०२६, कलम ३ (अ) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असून अर्जदाराच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार नामे निकीता नागोराव आरोटे हीचा जन्म दिनांक ०४/०४/२० केरुर, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे
पुढील सुनावणीची तारीख ०३–१२–२०२६ रोजी ठेवण्यात आली.
आज दिनांक १९–१०–२०२३ रोजी गाइया सहीनिशी व न्यायलयाच्या शिक्यानिशी दिले.
आदेशावरून

सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी न्यायालय बिलोली

**रक्तदान सर्वश्रेष्ठ दान**



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## वाडी बु. उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्यावर वाडीकरांचा बहिष्कार; निमंत्रण पत्रिकेतून स्थानिकांना डावलल्याचा आरोप

### आ. बालाजी कल्याणकर यांच्याविरोधात रोष; माजी पालकमंत्री डी. पी. सावंत यांचेही नाव वगळल्याने नाराजी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील वाडी बुद्रुक येथे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा १ नोव्हेंबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. मात्र या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत गावातील आजी- माजी सरपंचांसह स्थानिक लोकप्रतिनिधींची नावे नसल्याने वाडीकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, सोहळ्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

निमंत्रण पत्रिकेत लोहा-कंधार मतदारसंघाच्या माजी आमदारांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र नांदेडचे माजी पालकमंत्री आणि नांदेड उत्तरचे माजी आमदार डी. पी. सावंत यांचे नाव वगळण्यात आल्यानेही नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे रुग्णालय उभारणीसाठी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जमीन उपलब्ध करून देणाऱ्या वाडी बुद्रुकच्या सरपंचांचाही पत्रिकेत उल्लेख नाही. गावातील कोणत्याही गटातील स्थानिक पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींना स्थान न मिळाल्याने हा स्थानिकांचा अवमान असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

आमदार बालाजी कल्याणकर यांनी वाडीकरांना जाणीवपूर्वक डावलल्याचा आरोप काही स्थानिकांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर माजी सरपंच संभाजीराव तात्या पावडे, माजी सभापती बंडू पावडे, जि. प. च्या माजी सदस्या जयश्री पावडे, भाजपचे ॲड. निलेश पावडे, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, माजी सरपंच शिवाजीराव पावडे, भाजप नेते प्रतापराव पावडे, माजी पं. स. सदस्य निरंजन पावडे, माजी उपसरपंच बापुराव पावडे, कामगार सेना जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पावडे, चेअरमन दादाराव पावडे, विनोद पावडे, विश्वजीत पावडे, शिवसेनेचे नितीन बंडू पावडे, माजी सरपंच रमेश लोखंडे, माजी सरपंच दीपक बुक्तरे, माजी सरपंच निखिल गर्जे, माजी उपसरपंच हरिभाऊ पावडे, ग्रामपंचायत सदस्य रमेश पावडे, प्रहारचे शिवाजी पावडे यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिकांनी लोकार्पण सोहळ्यावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली आहे.

## अर्धापूर, मालेगाव, दाभड बुथवर पदवीधरांचे ६३.७७ टक्के मतदान

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** मराठवाडा पदवीधर मतदारसंघासाठी मतदान प्रक्रिया शुक्रवार रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत शांततेत पार पडली. आकडेवारी पाहता उच्चशिक्षित वर्गाचा मतदानाकडे संमिश्र प्रतिसाद मिळाला असून, केवळ ६३.७७ टक्के मतदान झाले आहे. उच्चशिक्षित आणि सुजाण नागरिकांकडून अशा महत्त्वाच्या निवडणुकीत मोठ्या सहभागाची अपेक्षा असते. मात्र प्रत्यक्षात अर्धापूर तालुक्यात मतदानाची टक्केवारी ६३.७७ टक्के झाली आहे. तब्बल १३३९ पैकी ८५४ मतदान झाले आहे.

तालुक्यात ३ मतदान केंद्र असून, अर्धापूर ७१० पैकी ४४८ (६३.०९%), दाभड २३३ पैकी १६२ (६९.५३%), मालेगाव ३९६ पैकी २४४ (६१.६१%) मतदान झाले आहे. यावेळी तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार राजेश शिंदे, सूर्यकांत ताडेवाड, झोनल अधिकारी म्हणून अभियंता सिध्देश्वर निला, मुख्याधिकारी जगदीश दळवी, भूमिअभिलेखचे अधिकारी शेख फय्याज, मंडळ अधिकारी बी. डी.कुऱ्हाडे, राजू इंगळे, लोणे, रामदास दुधाटे, तलाठी नितीन मोरे, मतदान केंद्राध्यक्ष अमित वासनिक, ए. डी.नंदागवळे, ए. एस. नरवाडे आदींनी मतदान प्रक्रिया पार पाडली. पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे आदी अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. शांततेत मतदान पार पडले.



यावेळी मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक अर्धापूर येथील बुथ केंद्राला माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी भेट दिली. यावेळी आमदार अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेट्टे, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, डॉ.विशाल लंगडे, संचालक व्यंकटराव साखरे, अजामो जिल्हाध्यक्ष रामराव भालेराव, मुस्वीर खतीब, प्रमुख दिलीप हट्टेकर, विजय देवडे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब, देवराव कांबळे आदीसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेसचे ओबीसी प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे यांनी पदवीधर मतदार केंद्राला भेट दिली. यावेळी तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे, माजी सभापती पप्पू बेग, जिल्हा सरचिटणीस अशोक बुटले, ओबीसी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब देशमुख आंबेगावकर, युवकचे शहराध्यक्ष रवी डाहाळे, अबुजर बेग, सचिव शेख मकसुद, तालुका उपाध्यक्ष बळीराम हट्टेकर, माजी जि. प. सदस्य प्रल्हादराव सोळंके, भीमराव सरोदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## किनवट तालुक्यात ११ मतदान केंद्रांवर ६२.८४ टक्के मतदान



**किनवट (प्रतिनिधी)–** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत शुक्रवार, दि. २३ रोजी किनवट तालुक्यात ६२.८४ टक्के मतदानाची नोंद झाली. तालुक्यातील ११ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. एकूण २ हजार ७५ मतदारांपैकी १ हजार ३०४ पदवीधर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

किनवट तालुक्यात सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. सरस्वती विद्यामंदिर महाविद्यालय, किनवट येथील दोन केंद्रांसह गोकुंदा, इस्लापूर, मांडवी, बोधडी बुद्रुक, सिंदगी, मोहपूर, दहेली, उमरी बाजार, जलधरा आणि शिवणी येथील मतदान केंद्रांवर पदवीधर मतदारांनी मतदान केले.

**पुरुष मतदारांचा सहभाग अधिक**

तालुक्यातील एकूण २ हजार ७५ मतदारांमध्ये १ हजार ६४० पुरुष आणि ४३५ महिला मतदारांचा समावेश होता. त्यापैकी १ हजार ७४ पुरुष आणि २३० महिला मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांची मतदानाची टक्केवारी ६५.४९, तर महिला मतदारांची टक्केवारी ५२.८७ इतकी राहिली. एकूण मतदान ६२.८४ टक्के नोंदविण्यात आले.

**दुर्गम भागांतील केंद्रांची पाहणी**

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी करण्यात आली. सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवणन यांनी किनवट तालुक्यातील मांडवी, उमरी बाजार आणि दहेली येथील दुर्गम भागांतील मतदान केंद्रांची पाहणी केली. यावेळी तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

किनवटच्या मतदान केंद्रावर आ. भीमराव केराम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या बेबीताई नाईक तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडण्यासाठी पोलीस निरीक्षक जगदीश मंडलावार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## हदगावमध्ये ५९.८९ टक्के मतदान; पुरुष मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग

### आठ मतदान केंद्रांवर १,८०५ मतदारांपैकी १,०८१ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**हदगाव (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील आठ मतदान केंद्रांवर झालेल्या मतदानात एकूण ५९.८९ टक्के मतदान झाले. मतदार यादीतील एकूण १ हजार ८०५ मतदारांपैकी १ हजार ८१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष मतदारांचा सहभाग महिलांच्या तुलनेत लक्षणीय अधिक राहिला.

उपलब्ध मतदान आकडेवारीनुसार, मतदार यादीत १ हजार ४०६ पुरुष, ३९८ महिला आणि एका इतर मतदाराचा समावेश होता. त्यापैकी ८९७ पुरुष, १८४ महिला आणि एकही इतर मतदाराने मतदान केले नाही. पुरुष मतदारांची मतदानाची टक्केवारी ६३.८० टक्के, तर महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी ४६.२३ टक्के राहिली.

हदगाव अर्बन-रुरल मतदान केंद्रावर सर्वाधिक ७०.०४ टक्के मतदान झाले. या केंद्रावर ५२४ मतदारांपैकी ३६७ मतदारांनी मतदान केले. त्यापाठोपाठ बारडशेवाळा येथे ६४.३३ टक्के, निवघा येथे ६३.१६ टक्के, तर तळणी येथे ५६.६७ टक्के मतदानाची नोंद झाली.

दरम्यान, मनाठा मतदान केंद्रावर सर्वाधिक ५५.९७ टक्के पुरुष मतदान, तर महिलांमध्ये हदगाव अर्बन-रुरल केंद्रावर ५८.१६ टक्के मतदान झाले. मनाठा येथे एकूण मतदानाची टक्केवारी ४९.७१ टक्के राहिली असून, आठही केंद्रांपैकी ती सर्वात कमी ठरली.

एकूणच, हदगाव परिसरातील आठ मतदान केंद्रांवर जवळपास ६० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने निकालाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची मतदानातील उपस्थिती कमी राहिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

## नायगाव तालुक्यात पदवीधर मतदारसंघासाठी ६१.१३ टक्के मतदान

### सहा मतदान केंद्रांवर प्रक्रिया शांततेत; १,३१८ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**नायगाव (प्रतिनिधी)–** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ अंतर्गत नायगाव (खै.) तालुक्यातील सहा मतदान केंद्रांवर शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. तालुक्यात एकूण २,१५६ मतदारांपैकी १,३१८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यानुसार तालुक्यात ६१.१३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

तालुक्यातील नायगाव, नरसी, मांजरम, घुंगराळा, बरबडा आणि कुंटूर या सहा मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. मतदान प्रक्रियेनंतर तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांच्याकडे मतदानाची टक्केवारी व अंतिम अहवाल सादर केला.

**मतदान केंद्रनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे** – नायगाव : ६०.२२ टक्के, नरसी : ६४.५९ टक्के, मांजरम : ५६.१५ टक्के, घुंगराळा : ६०.०९ टक्के, बरबडा : ६३.९६ टक्के, कुंटूर : ६२.७८ टक्के सहा मतदान केंद्रांवर मिळून १,१२७ पुरुष आणि १९१ महिला अशा एकूण १,३१८ मतदारांनी मतदान केले. निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडल्याची माहिती तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी दिली आहे.

## राजकीय विधानांची तत्काळ तथ्य-पडताळणीसाठी स्मार्ट उपकरण निर्मितीस पेटेन्ट प्रदान

### इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर येथील प्रा. डॉ. राजेश चालीकवार व त्यांच्या संशोधन समूहाचा नाविन्यपूर्ण उपक्रमास पेटेन्ट प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** डिजिटल युगात समाजमाध्यमे, दूरचित्रवाणी, राजकीय भाषणे आणि सार्वजनिक चर्चांच्या माध्यमातून माहितीचा प्रसार वेगाने होत आहे. मात्र, या माहितीमध्ये सत्य, असत्य, अर्धसत्य आणि दिशाभूल करणाऱ्या दाव्यांची सरमिसळ असल्याने नागरिकांसमोर माहितीची विश्वासार्हता तपासण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. या समस्येवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपाय शोधण्याच्या दृष्टीने प्रा. डॉ. राजेश चालीकवार आणि त्यांच्या संशोधन समूहाने 'Fact Checking Wearable Device' अर्थात राजकीय विधानांची तथ्य-पडताळणी करणारे स्मार्ट उपकरण ही अभिनव संशोधन संकल्पना विकसित केली आहे आणि त्याला भारत सरकारच्या वतीने अभिनव संकल्पनेला मान्यता देऊन पेटेन्ट प्रदान केले आहे. या संशोधन संकल्पनेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), नैसर्गिक भाषा प्रक्रिया, स्वयंचलित वाणी ओळख तंत्रज्ञान आणि पडताळलेल्या माहिती-स्रोतांचा एकत्रित वापर करून राजकीय विधानांचे विश्लेषण करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. स्मार्टवॉच किंवा ब्रेसलेटसारख्या उपकरणाच्या माध्यमातून भाषणातील तथ्यात्मक दावे ओळखणे, उपलब्ध अधिकृत नोंदी व विश्वासार्ह स्रोतांशी त्यांची तुलना करणे आणि संभाव्यतः दिशाभूल करणाऱ्या विधानांबाबत वापरकर्त्याला तत्काळ सूचना देणे, हे या संकल्पनेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

आजच्या माहितीप्रधान समाजात चुकीच्या माहितीचा प्रसार हा केवळ तांत्रिक प्रश्न नसून लोकशाही, सार्वजनिक मतनिर्मिती, माध्यम साक्षरता आणि नागरिकांच्या निर्णयक्षमतेशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. निवडणुका, राजकीय प्रचार, सार्वजनिक धोरणे, संसदीय चर्चा आणि प्रसारमाध्यमां- मधील दाव्यांचे मूल्यमापन करताना या तंत्रज्ञानाचा भविष्यात उपयोग होऊ शकतो. या उपकरणाद्वारे एखाद्या विधानाचे ध्वनीमुद्रण मजकुरात रूपांतरित करून त्यातील तथ्यात्मक दावे ओळखण्याची आणि संबंधित पुराव्यांशी त्यांची तुलना करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे. एखाद्या दाव्याबाबत विसंगती आढळल्यास उपकरण कंपनाद्वारे सूचना देऊ शकते आणि टचस्क्रीनवर संबंधित संदर्भ उपलब्ध करून देऊ शकते. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, संशोधक, पत्रकार आणि राजकीय विश्लेषक यांना माहितीचे चिकित्सक मूल्यमापन करण्यासाठी सहाय्य मिळू शकते. तसेच भविष्यकालीन संसोधनासाठी देखील स्मार्ट वॉच, गाग्लस, पेन्स, किचन यांच्या माध्यमातून सदरील उपकरण हाताळणे अधिक सहज करता येऊ शकते अशी भविष्यकालीन संसोधनाची दिशा सुधा सदरील पेटेन्ट देत आहे.

या संशोधनाचा केंद्रबिंदू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि घालण्यायोग्य उपकरण यांच्या एकत्रित वापरातून प्रत्यक्ष वेळेतील तथ्य-पडताळणीची सुविधा उपलब्ध करून देण्याची तांत्रिक संकल्पना. उपकरणाची रचना, ध्वनीचे मजकुरात रूपांतर, दाव्यांचे विश्लेषण, विश्वासार्ह माहिती-स्रोतांशी तुलना, कंपनाद्वारे सूचना आणि पुराव्यांपर्यंत सहज प्रवेश या बाबींचा प्रस्तावित तांत्रिक आराखड्यात समावेश आहे. या संशोधन संकल्पनेमुळे भविष्यात माहितीविषयक जागरूकता वाढविणे, नागरिकांमध्ये चिकित्सक विचार विकसित करणे, डिजिटल माध्यमांचा जबाबदार वापर प्रोत्साहित करणे आणि पुराव्यांवर आधारित सार्वजनिक चर्चा घडवून आणणे यांना चालना मिळू शकते. तथापि, कृत्रिम बुद्धिमत्तेने दिलेली सूचना ही अंतिम सत्याची हमी नसून उपलब्ध पुरावे आणि संदर्भांच्या आधारे केलेले प्राथमिक मूल्यमापन असते. त्यामुळे मानवी विवेकबुद्धी, स्रोतांची विश्वासार्हता आणि संदर्भाचे योग्य आकलन यांना या प्रणालीमध्ये महत्त्व राहते. सदरील संसोधन समुहात प्रा. डॉ. राजेश चालीकवार, संजय साळवे, प्रा डॉ प्रवित्रा त्रिपाठी, प्रा डॉ सत्यपाल कांबळे, प्रा डॉ प्रदीप त्रिपाठी यांचा संशोधन समूहात समावेश होता.

## धर्माबाद बाजार समितीत हमाली दरवाढीवरून संघर्ष पेटला!

### हमाल कामगारांचे काम बंद आंदोलन; बाजार समितीचा अल्टिमेटम, परवाना रद्द करण्याचा इशारा

**धर्माबाद (प्रतिनिधी)–** धर्माबाद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात हमाली दरवाढीच्या प्रश्नावरून हमाल कामगार आणि बाजार समिती प्रशासन यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हमाल कामगारांनी विविध कामांचे दर वाढवून लागू करण्याची मागणी केली आहे. तसेच धर्माबाद बाजार समितीच्या मार्केट यार्डातील हमाली दराची तीन वर्षांची मुदत संपल्यामुळे दरवाढ करण्यात यावी, शेतमालाची हाताळणी ५० किलो वजनाच्या कट्ट्याप्रमाणे करण्यात यावी, तसेच उतराई, चाळणी, काटा, गाडी भरणे, थप्पी, गोदामातील मालाची हाताळणी यांसह विविध कामांसाठी स्वतंत्र दर निश्चित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

हमाल कामगारांनी सादर केलेल्या दरपत्रकात विविध कामांसाठी ५ ते १७ रुपयांपर्यंतचे दर आणि काही कामांसाठी प्रतिटन दर प्रस्तावित



करण्यात आले आहेत. या दरपत्रकाला आडतदार व व्यापाऱ्यांनी मान्यता देऊन ते बाजार समितीत लागू करावे, अशी भूमिका हमाल प्रतिनिधी शिवराम भंगारे यांच्यासह हमालांनी घेतली आहे. या प्रश्नावर १७ आणि २२ ऑक्टोबर रोजी बाजार समिती कार्यालयात आडतदार, व्यापारी व हमाल प्रतिनिधींच्या बैठका झाल्या. बाजार समितीच्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार, शेतमाल उतराईसाठी प्रतिकट्टा ४ रुपये आणि चाळणी-काट्यासाठी प्रतिकट्टा १३ रुपये असे दर प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, संबंधित दोन कामांसाठी मिळून प्रतिकट्टा ३ रुपयांची वाढ करण्यात येणार आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका**

हमाली दराची तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर दरवाढीच्या मागणीवर बैठका घेण्यात आल्या. उतराईसाठी प्रतिकट्टा ४ रुपये आणि चाळणी-काट्यासाठी प्रतिकट्टा १३ रुपये दर प्रस्तावित. संबंधित दोन कामांसाठी मिळून प्रतिकट्टा ३ रुपयांची वाढ प्रस्तावित असल्याचे प्रशासनाचे म्हणणे. हमालांनी काम तातडीने सुरू करावे, असे आवाहन करण्यात आले. काम बंद ठेवल्यास परवाना कायमस्वरूपी रद्द करणे, पर्यायी व्यवस्था आणि कायदेशीर कारवाईचा इशारा. सोयाबीनची मोठी आवक सुरू असताना काम बंद ठेवून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये.

**हमाल कामगारांची भूमिका**

हमाली दराची मुदत संपल्याने नवीन दर लागू करण्याची मागणी. शेतमालाची हाताळणी ५० किलो वजनाच्या कट्ट्याप्रमाणे करण्याची भूमिका. उतराई, चाळणी, काटा, गाडी भरणे, थप्पी आणि गोदामातील कामांसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्याची मागणी. विविध कामांसाठी ५ ते १७ रुपयांपर्यंतचे दर आणि काही कामांसाठी प्रतिटन दर प्रस्तावित. प्रस्तावित दरवाढ मान्य नसल्याने हमालांनी काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेतला. वाढती महागाई, शारीरिक मेहनत आणि कामाचे स्वरूप लक्षात घेऊन योग्य हमाली दर निश्चित करावेत.

## मदनराव जोंधळे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या इतवारा, मोहम्मद अली रोड येथील ज्येष्ठ उपासक व सेवानिवृत्त नायब तहसीलदार मदनराव श्रीधरराव जोंधळे यांचे गुरुवार, २२ ऑक्टोबर रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता रामघाट (जुना मोंढा, नांदेड) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रीतमकुमार जोंधळे यांचे ते वडील होत.

## हणमंतराव अनपलवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–**बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी हणमंतराव लच्छमन्ना अनपलवार-आदमपूरकर (जमादार) यांचे शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी रात्री १२:०३ वाजता दीर्घ आजाराने नांदेड रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी ३:३० वाजता आदमपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मुखेड उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी आदमपूरकर व खतगाव प्राथमिक रुग्णालयातील औषध निर्माण अधिकारी लक्ष्मण अनपलवार यांचे वडील होत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com